# महाराष्ट्र चेंबर पत्रिका

August - September 2025/Issue No. 07 | Price : Rs. 30/-




वाढदिवस - 17 सप्टेंबर

## अमृत महोत्सवी शुभेच्छा !

संस्थेच्या
शतक महोत्सवी क्षणांना
सुवर्णतेज लाभले...

भारताला आर्थिक महासत्ता
बनवणारे लाडके पंतप्रधान
**मा. श्री. नरेंद्रजी मोदी** यांचा
75 वा **वाढदिवस !**

मनाने कणखर,
विचाराने राष्ट्रभक्त,
कृतीने सर्वोत्तम,
त्यागाने जगन्मान्य,
व्यक्तित्वाने लढाऊ

मा. पंतप्रधानांचे आवाहन
नेहमी उद्योग व व्यापार क्षेत्राला
नवी आत्मनिर्भर दिशा देणारे !

भारतीय उद्योगाला गती, कृती, नीती देऊन
जागतिक ओळख देणारी ऊर्जा !

## 75 वर्षे ऊर्जेची !
## मोदीजींच्या नेतृत्वाची !

CELEBRATING 100 YEARS

100

ESTD 1927

MACCIA

Apex Chamber of the State

MAHARASHTRA CHAMBER OF
COMMERCE, INDUSTRY & AGRICULTURE

# महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स इंडस्ट्री अँड ॲग्रीकल्चर

**ओरिकॉन हाऊस, ६ वा मजला, महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स लेन, काला घोडा, फोर्ट, मुंबई ४००००१**

## ९८ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची सुचना

**चेंबरचे सर्व सन्मानीय सभासद आणि सभासद संस्था**

स. न. वि. वि.

महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री अँड ॲग्रिकल्चर या संस्थेची **९८ वी वार्षिक सर्वसाधारण सभा** दिनांक २३ सप्टेंबर २०२५ रोजी दुपारी ३:०० वाजता बाबासाहेब डहाणूकर हॉल, महाराष्ट्र चेंबर मुख्य कार्यालय, मुंबई येथे आयोजित होणार आहे. तरी कृपया या सभेस उपस्थित रहावे ही विनंती.

**• सभेचे विषय •**

- सभेची विषय सुची कायम करणे
- १६ सप्टेंबर २०२४ रोजी झालेल्या ९७ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेच्या इतिवृत्तास मंजुरी देणे.
- ९८ वा वार्षिक अहवाल स्वीकारणे.
- २०२५-२६ या कालावधीसाठी झालेल्या अध्यक्ष, वरिष्ठ उपाध्यक्ष यांच्या निवडणुकीचा निकाल जाहीर करणे.
- घटनादुरुस्तीबाबत विशेष सर्वसाधारण सभेने घेतलेल्या निर्णयांची नोंद घेणे.
- ५१ वे वालचंद स्मृती व्याख्यान व समारंभ आयोजित करणे.
- लेखा परीक्षकांनी तपासलेला २०२४-२०२५ या वर्षाचा ताळेबंद व जमा खर्च मंजूर करणे.
- पुढील वर्षासाठी लेखापरीक्षकांची नेमणूक व त्यांचे मानधन निश्चित करणे
- ऐनवेळी येणाऱ्या विषयांवर अध्यक्षांच्या परवानगीने विचार विनिमय करणे

आपला विश्वासू,

**नितीन शेलार**
उपसचिव

मंगळवार दि. ०९ सप्टेंबर २०२५
मुंबई

**टीप:**

१) वार्षिक सभास्थान हे उच्च सुरक्षा श्रेणीमधील असल्याने सभा स्थानाच्या व्यवस्थापन समितीने दिलेल्या सूचनेनुसार कार्यक्रमाच्या उपस्थितीसाठी पूर्व नोंदणी व सभा स्थानी प्रवेशासाठी फोटो ओळखपत्र अत्यावश्यक आहे. नोंदणीसाठी वरील क्युआर कोड देण्यात आला आहे.

२) ९८ वा वार्षिक अहवाल संस्थेच्या वेबसाईट वर प्रकाशित करण्यात आला असून सदर अहवाल मुंबई, नाशिक कार्यालयासह वार्षिक सभास्थानी उपलब्ध असेल.

३) घटना दुरूस्तीच्या प्रस्तावावर निर्णय घेणेसाठी २३ सप्टेंबर २०२५ रोजी सकाळी ११ वाजता बाबासाहेब डहाणूकर हॉल, महाराष्ट्र चेंबर मुख्य कार्यालय, मुंबई येथे **'विशेष सर्वसाधारण सभेचे'** आयोजन केले आहे. सदर सभेचा सविस्तर तपशील वरील क्युआर कोड स्कॅन करून पाहता येईल.

CELEBRATING 100 YEARS

MACCIA ESTD 1927
Apex Chamber of the State
MAHARASHTRA CHAMBER OF COMMERCE, INDUSTRY & AGRICULTURE

# महाराष्ट्र चेंबर पत्रिका

August - September 2025/ Issue No. 07

**महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री ॲण्ड ॲग्रिकल्चर**

ओरिकॉन हाऊस, ६ वा मजला, महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स मार्ग, काळा घोडा, फोर्ट, मुंबई- ४००००१
फोन : (०२२) २२८५५८५९/६०
ई-मेलः maccia@maccia.org.in
वेबसाईट : www.maccia.org.in

**संपादकीय समिती**

- अध्यक्ष व संपादक
  **ललित गांधी**
- वरिष्ठ उपाध्यक्ष
  **रविंद्र माणगावे**
- उपाध्यक्ष
  **करूणाकर शेट्टी**, **शंकर शिंदे**, **संजय सोनवणे**, **संगीता पाटील**, **रमाकांत मालु**, **दिलीप गुप्ता**, **प्रफुल मालाणी**, **श्रीकृष्ण परब**
- सहसंपादक : **अविनाश पाठक**

- **उत्तर महाराष्ट्र विभागीय कार्यालय**
  ४९, पाचवा मजला, बिजनेस बे, श्रीहरी कुटे मार्ग, मुंबई नाका, नाशिक - ४२२००१
  फोनः (०२५३)२५७७७०४
- **पूणे जिल्हा कार्यालय**
  प्लॉट नं. ईएल-१५, एमआयडीसी, भोसरी, पूणे - ४११०२६.
- **जळगांव जिल्हा कार्यालय**
  २१-ए,श्रीराम स्टेट बँक कॉलनी, रिंगरोड, जळगाव - ४२५००१
- **कोल्हापूर जिल्हा कार्यालय**
  बिझनेस हाऊस, राजारामपूरी १० वी गल्ली, कोल्हापूर - ४१६००८
- **बारामती उप-जिल्हा कार्यालय**
  प्लॉट नं. सी–८८, हॉटेल सुर्या जवळ, एमआयडीसी भिंगवान रोड, बारामती, पुणे – ४१३१३३

**इतर कार्यालय** : अंधेरी (मुंबई), नवी मुंबई, ठाणे, पालघर, धुळे, रत्नागिरी, पलुस (सांगली)

**Note :** Articles published in this bulletin do not necessarily reflect the views of the Maharashtra Chamber of Commerce, Industry & Agriculture.

## अंतरंग

१. विकासाच्या नव्या युगाचा शिल्पकार - पंतप्रधान नरेंद्र मोदींचा अमृत महोत्सवी प्रवास
२. GST 2.0 : उद्योग-व्यवसायाला दिलासा
३. अमेरिकेचे ५०% टेरिफः आव्हान की संधी?
४. शेतकऱ्यांचे हित हेच आमचे सर्वोच्च प्राधान्य...
५. भारतीय आहोत, भारतीयच वापरु! - अभियान
६. भारत-ब्रिटन CET : ऐतिहासिक करार; नव्या आर्थिक युगाची नांदी
७. भारताच्या आर्थिक विकासाला गती देणारे 'Income-tax (No. 2) Bill, 2025'
८. बंदर कायदा व भूमि नोंदी डिजिटायझेशनः राज्यातील उद्योग-व्यापार-कृषीला नवा वेग
९. महाराष्ट्र चेंबर पत्रिका शताब्दी महोत्सवी अंकाचे मुख्यमंत्र्यांच्या हस्ते प्रकाशन
१०. भारतीय वस्त्रोद्योग निर्यातीवर संकटाचे सावट...
११. अमेरिकन टॅरिफला तोंड देण्यासाठी केंद्राची २० हजार कोटींची विशेष योजना
१२. सरकारने 'वन नेशन वन पॉवर रेट' धोरण आणावे : ललित गांधी
१३. भारताचे सिंगापूरसोबत पाच मोठे करार

**संपादकीय..**

# GST 2.0 : करसुधारणेचा नवा अध्याय

भारताच्या आर्थिक प्रवासात करप्रणाली हा नेहमीच गोंधळ व गुंतागुंतीचा विषय राहिला आहे. ''एक राष्ट्र – एक कर '' या संकल्पनेला मूर्त रूप देणारा जीएसटी (GST) लागू झाल्यानंतर देशातील व्यापारी, उद्योग व ग्राहकवर्गाला अनेक सोयी मिळाल्या. मात्र प्रत्यक्षात चार वेगवेगळ्या करस्लॅबमुळे पारदर्शकता कमी झाली, उद्योगांवर करभार वाढला आणि ग्राहकांमध्ये संभ्रम निर्माण झाला. या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारने नुकत्याच जाहीर केलेल्या GST २.० सुधारणांमध्ये दूरगामी परिणाम घडवून आणण्याची क्षमता आहे.

पूर्वीचे ५%, १२%, १८% आणि २८% हे चार करस्लॅब रद्द करून केवळ दोनच दर ठेवले जाणे ही या सुधारणेची सर्वात महत्त्वाची बाब आहे. साधेपणामुळे करपद्धती अधिक पारदर्शक बनेल. उद्योगांना उत्पादनखर्च मोजणे, नियोजन करणे व गुंतवणूक ठरवणे सुलभ होईल. दुसरीकडे, ग्राहकांना कोणत्या वस्तूवर किती कर लागू आहे, याचा स्पष्ट अंदाज घेता येईल.

FMCG वस्तूंवरील करदर १८% वरून ५% करण्यात आल्यामुळे साबण, शॅम्पू, टूथपेस्ट यांसारख्या वस्तू सर्वसामान्यांच्या आवाक्यात येतील. पनीर, रोटी, UHT दूध यांसारख्या दैनंदिन खाद्यपदार्थांवरील कर पूर्णतः रद्द करण्यात आल्याने ग्राहकांना थेट लाभ होईल. या स्वस्ताईमुळे बाजारातील मागणी वाढून FMCG क्षेत्रात नवीन गुंतवणूक व रोजगारनिर्मिती होण्याची शक्यता आहे.

दोनचाकी व लहान कारांवरील करदर २८% वरून १८% करण्यात आला आहे. भारतीय मध्यमवर्ग हा वाहन उद्योगाचा कणा आहे. करकपातीमुळे वाहन खरेदी सुलभ होईल आणि उद्योगातील स्थिरतेला बळकटी मिळेल. बांधकाम क्षेत्रातील सिमेंट, टीव्ही, एसी, डिशवॉशर यांसारख्या वस्तूंवरील करकपात पायाभूत सुविधा व गृहविकास प्रकल्पांना गती देईल.

GST २.० चा एक महत्त्वाचा पैलू म्हणजे MSME आणि कारागिरांसाठीचा प्रोत्साहनपर दृष्टिकोन. पेन्सिल, नोटबुक, इरेझर यांसारख्या शैक्षणिक साहित्यांवर करमुक्ती देण्यात आली आहे. ग्रामीण भागातील कारागिर व हस्तकला व्यावसायिकांसाठी केवळ ५% कर ठेवण्यात आला आहे. हे निर्णय ग्रामीण अर्थव्यवस्था मजबूत करण्यासाठी आणि रोजगारनिर्मिती वाढविण्यासाठी निश्चितच सकारात्मक ठरतील.

जीवन व आरोग्य विमा पूर्णतः करमुक्त झाल्याने सामान्य नागरिकांचा विमा क्षेत्राकडे कल वाढेल. यामुळे दीर्घकालीन सामाजिक सुरक्षिततेला बळकटी मिळेल. पर्यटन आणि वेलनेस क्षेत्रालाही चालना देण्यात आली आहे. हॉटेलमधील ₹७,५०० पर्यंतच्या खोलीभाड्यावर केवळ ५% कर आणि जिम, योग, ब्युटीपार्लर यांवरील कमी दरामुळे या उद्योगांमध्ये गुंतवणुकीची नवी संधी निर्माण होईल.

सिन प्रॉडक्ट्स म्हणून ओळखल्या जाणाऱ्या सिगारेट, गुटखा व शीतपेये यांवरील करदर ४०% करण्यात आला. हा निर्णय महसूल वाढीसाठी नसून सार्वजनिक आरोग्य लक्षात घेऊन घेतलेला आहे. सरकारचा हा दृष्टिकोन कौतुकास्पद आहे. आरोग्यास अपायकारक सवयींना आळा बसण्यास मदत होईल, ही अपेक्षा आहे.

नव्या करदरांमुळे महसूलात काही प्रमाणात घट होण्याची शक्यता आहे. मात्र वाढलेली मागणी, वाढलेली खरेदीशक्ती व वाढलेली गुंतवणूक या तुटीची भरपाई करतील, असा सरकारला विश्वास आहे.

GST २.० हा केवळ करसुधारणेचा मुद्दा नाही; तर तो उद्योग, व्यापार, कृषी व सेवाक्षेत्राच्या प्रगतीसाठी एक धोरणात्मक पाऊल आहे. या सुधारणा उद्योगविश्वाला दिलासादायक ठरतील, तसेच ग्राहकांना थेट लाभ देतील आणि ग्रामीण तसेच शहरी अर्थव्यवस्थेत नवा आत्मविश्वास निर्माण करतील.

२२ सप्टेंबर २०२५ हा दिवस भारतीय करप्रणालीच्या इतिहासातील नवा अध्याय ठरेल. GST २.० ही केवळ करकपात नसून आर्थिक सशक्तीकरणाची नवी संधी आहे. या संधीचा उपयोग करून उद्योगजगत आणि ग्राहकवर्ग मिळून भारताच्या अर्थव्यवस्थेला अधिक मजबूत व सक्षम बनवू शकतील, अशी आशा व्यक्त करूया...

ललित गांधी
**अध्यक्ष**



# विकासाच्या नव्या युगाचा शिल्पकार

## पंतप्रधान नरेंद्र मोदींचा अमृत महोत्सवी प्रवास



**भारताच्या राजकीय, सामाजिक आणि आर्थिक क्षेत्रात गेल्या काही दशकांत अनेक बदल घडले. परंतु २०१४ पासून भारताने अनुभवलेली प्रचंड प्रगती, राष्ट्राभिमानाची नव्याने झालेली जपणूक आणि जागतिक पटलावर मिळवलेली ठाम ओळख हे सर्व पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वामुळे शक्य झाले. १७ सप्टेंबर २०२५ रोजी नरेंद्र मोदी ७५ वर्षांचे होत आहेत. या अमृत महोत्सवी वाढदिवसानिमित्त त्यांच्या कार्याचा, धोरणांचा आणि भारताला दिलेल्या दिशा-दर्शनाचा थोडक्यात आढावा घेणे उचित ठरेल.**

**● पंतप्रधानपदी निवड :**

२०१४ मध्ये झालेल्या सार्वत्रिक निवडणुकीत भारतीय जनता पक्षाला प्रचंड बहुमत मिळाले आणि नरेंद्र मोदी यांनी देशाचे पंतप्रधानपद स्वीकारले. २०१९ मध्ये पुन्हा एकदा त्यांनी बहुमतासह सत्ता मिळवत नेतृत्वाचा ठसा उमटवला.

**● विकासकामांचा आढावा :**

**१) आर्थिक क्षेत्रातील सुधारणा**

GST **(वस्तू व सेवा कर) :** करव्यवस्थेचे सरलीकरण करून उद्योग-व्यवसायाला दिलासा.

**मेक इन इंडिया' अभियान :** उत्पादनक्षेत्रात गुंतवणूक वाढवून रोजगार निर्मिती.

**स्टार्टअप इंडिया आणि डिजिटल इंडिया :** नवउद्योजकांना प्रोत्साहन, तंत्रज्ञानावर आधारित अर्थव्यवस्थेला चालना.

**जनधन योजना :** कोट्यवधी गरीबांना बँकिंग व्यवस्थेत सहभागी करून आर्थिक समावेशन.

**२) पायाभूत सुविधा व वाहतूक :**

**भारतमाला व सागरमाला प्रकल्प :** महामार्ग आणि किनारी भागातील विकास.

**गतीशक्ती योजना :** वेगवान रेल्वे, मेट्रो, विमानतळ आदी प्रकल्पांना चालना.

**स्मार्ट सिटी अभियान :** शहरे आधुनिक आणि तंत्रसुसज्ज बनवण्याची दिशा.

**३) सामाजिक आणि ग्रामीण क्षेत्र :**

**स्वच्छ भारत अभियान :** शौचालयनिर्मिती, स्वच्छतेबाबत जनजागृती.

**उज्वला योजना :** महिलांना धुरमुक्त स्वयंपाकघरासाठी गॅस सिलेंडर.

**आयुष्मान भारत योजना :** गरीब कुटुंबांसाठी मोफत आरोग्य विमा.

**जल जीवन मिशन :** ग्रामीण भागात स्वच्छ पाणी पुरवठा.

**४) कृषी क्षेत्र :**

पीएम-किसान योजनेद्वारे शेतकऱ्यांच्या खात्यात थेट मदत. सेंद्रिय शेतीला प्रोत्साहन आणि पिकांच्या हमीभावावर ठोस पावले.

**५) परराष्ट्र धोरण :**

मोदी यांनी 'वसुधैव कुटुंबकम' या भारतीय तत्त्वज्ञानाला आंतरराष्ट्रीय स्तरावर मान्यता मिळवून दिली.

अमेरिका, रशिया, फ्रान्स, जपान यांसारख्या राष्ट्रांशी धोरणात्मक भागीदारी मजबूत केली.

जी-२० शिखर परिषदेचे यशस्वी आयोजन भारताने मोदींच्या नेतृत्वाखाली केले.

**६) संरक्षण आणि सुरक्षा :**

सर्जिकल स्ट्राईक आणि बालाकोट हल्ला करून दहशतवादाविरुद्ध ठाम भूमिका. 'आत्मनिर्भर भारत' मोहिमेखाली संरक्षणसामग्रीचे स्वदेशी उत्पादन.

**● मोदींचा नेतृत्वदृष्टिकोन :**

मोदी यांच्या कार्यशैलीत निर्णयक्षमता, दृढ निश्चय आणि जनतेशी थेट संवाद हे गुण प्रकर्षाने दिसतात. मन की बात या रेडिओ कार्यक्रमातून त्यांनी प्रत्येक नागरिकाशी संवाद साधला. सामाजिक माध्यमांद्वारे त्यांनी तरुण पिढी सोबत संवाद साधला.

**● जागतिक पटलावर भारताची ओळख :**

मोदी यांच्या कार्यकाळात भारताची प्रतिमा जागतिक स्तरावर एक मजबूत, आत्मविश्वासपूर्ण आणि वेगाने विकसित होणारा देश अशी निर्माण झाली. भारताने अवकाश संशोधनात चांद्रयान-३ व गगनयान मोहिमांमुळे नवी झेप घेतली. तसेच नवी दिल्लीमध्ये आयोजित केलेल्या G20 शिखर परिषदेने भारताची आंतरराष्ट्रीय भूमिका ठळक केली.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाने भारताने विकासाच्या नव्या युगात प्रवेश केला आहे. गरीब कल्याण, आर्थिक सुधारणा, जागतिक नेतृत्व आणि राष्ट्रीय सुरक्षा यांसारख्या क्षेत्रात त्यांनी भक्कम पायाभरणी केली. त्यांच्या अमृत महोत्सवी वाढदिवसानिमित्त भारत आज आत्मनिर्भरतेच्या, प्रगतीच्या आणि नव्या आशेच्या वाटेवर दृढ पाऊल टाकत आहे.

**ललित गांधी,**
**अध्यक्ष, महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स**

# GST 2.0 : उद्योग-व्यवसायाला दिलासा

## २२ सप्टेंबरपासून दोनच करस्लॅब लागू; MSME, कृषी व सेवाक्षेत्राला मोठा फायदा ; ग्राहकांनाही स्वस्ताईची भेट

**नवी दिल्ली : भारत सरकारने वस्तू व सेवा कर प्रणालीत (GST) मोठी व ऐतिहासिक सुधारणा जाहीर केली आहे. GST २.० या नावाने ओळखल्या जाणाऱ्या या सुधारणा २२ सप्टेंबर २०२५ पासून देशभर लागू होणार असून कररचनेत आमूलाग्र बदल घडवून आणले आहेत. आतापर्यंत अस्तित्वात असलेले चार करस्लॅब – ५%, १२%, १८% आणि २८% – रद्द करून केवळ दोनच स्लॅब ठेवण्यात आले आहेत. यामध्ये ५% आणि १८% अशी रचना असून यामुळे करप्रणाली अधिक सोपी, पारदर्शक व उद्योगस्नेही होईल, असा सरकारचा दावा आहे.**

**उद्योग व उत्पादन क्षेत्राला दिलासा :**

GST २.० चा थेट परिणाम देशातील उत्पादनखर्चावर होणार आहे. ग्राहकांच्या दैनंदिन वापरातील साबण, शॅम्पू, टूथपेस्ट, टूथब्रश यांसारख्या FMCG वस्तूंवरील कर १८% वरून ५% करण्यात आला आहे. तसेच पनीर, रोटी, UHT दूध यांसारख्या खाद्यपदार्थांवरील कर पूर्णपणे रद्द करण्यात आला आहे. या निर्णयामुळे बाझारातील मागणी वाढून FMCG उद्योगाला प्रोत्साहन मिळेल, अशी अपेक्षा आहे.




वाहन उद्योगालाही सरकारने मोठा दिलासा दिला आहे. दोनचाकी वाहने व लहान कारांवरील कर २८% वरून १८% करण्यात आला असून त्यामुळे मध्यमवर्गीयांना मोठा फायदा होईल. बांधकाम क्षेत्रातील सिमेंट, टेलिव्हिजन, एसी, डिशवॉशर यांसारख्या वस्तूंवरील करदरही कमी करण्यात आला आहे. यामुळे बांधकाम व पायाभूत सुविधांच्या विकासाला गती मिळेल तसेच रिअल इस्टेट आणि ऑटोमोबाईल क्षेत्रात गुंतवणूक वाढेल, अशी शक्यता आहे.

- **MSME व कारागिरांसाठी नवा श्वास :**

GST २.० मध्ये सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांना (MSME) विशेष प्राधान्य देण्यात आले आहे. शालेय साहित्यांवर – पेन्सिल, इरेझर, नोटबुक याला पूर्णपणे करमुक्ती देण्यात आली आहे. हस्तकला व पारंपरिक वस्तूंवर फक्त ५% कर आकारण्यात येणार आहे. यामुळे ग्रामीण कारागीर, हस्तकला व्यवसायिक व लघुउद्योजकांना मोठा फायदा होईल.

(पुढील पानावर)

## अर्थव्यवस्थेला मिळणार नवा बूस्टर : पंतप्रधान



वस्तू व सेवा कर (जीएसटी) संरचनेत करण्यात आलेल्या सुधारणा भारताच्या आर्थिक विकासासाठी नवसंजीवनी ठरणार आहेत. या सुधारणांमुळे देशाला दुहेरी ताकद मिळेल, असे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सांगितले. नव्या व्यवस्थेचा लाभ १ नोव्हेंबरपासून देशभर लागू होणार असून, ग्राहक व व्यापाऱ्यांना थेट फायदा होईल.

जीएसटी परिषदेने महत्त्वाचा निर्णय घेत चार टप्प्यांचा कर दर कमी करून दोन टप्प्यांत आणण्यास मान्यता दिली आहे. याशिवाय दैनंदिन वापरातील अनेक वस्तूंना पाच टक्के कर दरात सामावून घेतले गेले आहे. यामुळे सर्वसामान्य ग्राहकांना दिलासा मिळणार असून, व्यापार अधिक सुलभ होणार असल्याचे पंतप्रधान म्हणाले.

पंतप्रधान मोदी यांनी शिक्षक दिनानिमित्त संवाद साधताना सांगितले की, भारताच्या प्रगतीसाठी सातत्याने सुधारणा आवश्यक आहेत. मी देशवासीयांना दिवाळीपूर्वी दुहेरी आनंद देण्याचे आश्वासन दिले होते. त्यानुसार या सुधारणांची अंमलबजावणी केली आहे. त्यांच्या मते, नव्या जीएसटी व्यवस्थेमुळे व्यापारात सुलभता वाढेल आणि २१ व्या शतकात भारताच्या प्रगतीला बळ मिळेल.

काँग्रेसवर टीका करताना मोदी म्हणाले की, त्यांच्या सत्ताकाळात आवश्यक वस्तूंवर प्रचंड कर आकारला जात होता. त्यामुळे सर्वसामान्य नागरिक त्रस्त होत होते. मात्र, विद्यमान सरकारने जनतेच्या सोयीचा विचार करून करदर कमी करण्याचा निर्णय घेतला आहे. या सुधारणांमुळे भारताच्या अर्थव्यवस्थेला प्रोत्साहन मिळून ती अधिक मजबूत होईल. जागतिक स्तरावर देशाला स्पर्धेत महत्त्वाचे स्थान मिळेल, असा विश्वास पंतप्रधानांनी व्यक्त केला. आगामी काळात या सुधारणांचा लाभ उद्योग, व्यापार तसेच सर्वसामान्य कुटुंबांना मिळणार आहे.

सरकारच्या या निर्णयामुळे ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना मिळेल आणि रोजगारनिर्मितीला नवा वेग येईल.

- **सेवाक्षेत्राचा विस्तार :**

नव्या सुधारणांमध्ये सेवाक्षेत्राला देखील प्रोत्साहन देण्यात आले आहे. जीवन विमा व आरोग्य विमा यांना पूर्णपणे जीएसटीमुक्त करण्यात आले आहे. यामुळे सामान्य नागरिकांना विमा योजनांकडे वळणे सोपे जाईल. हॉटेलमधील ₹७,५०० पर्यंतच्या खोलीभाड्यावर केवळ ५% कर लागू करण्यात आला आहे. तसेच जिम, योग, ब्युटीपार्लर व सलून सेवांवरही ५% करदर ठेवण्यात आला आहे. या निर्णयामुळे पर्यटन, वेलनेस आणि हॉस्पिटॅलिटी क्षेत्रात गुंतवणुकीस चालना मिळेल आणि रोजगाराच्या नव्या संधी निर्माण होतील.

- **'सिन प्रॉडक्ट्स'वर कडक कारवाई :**

आरोग्यास अपायकारक उत्पादने म्हणून गणल्या जाणाऱ्या सिगारेट, गुटखा, तंबाखूजन्य पदार्थ आणि शीतपेयांवर मात्र सरकारने कठोर भूमिका घेतली आहे. या उत्पादनांवरील करदर ४०% करण्यात आला आहे. महसुलात काही प्रमाणात घट होण्याची शक्यता असली तरी FMCG, ऑटोमोबाईल आणि बांधकाम क्षेत्रात वाढणारी मागणी ही तूट भरून काढेल, असा विश्वास सरकारने व्यक्त केला आहे.

- **अर्थव्यवस्थेवर परिणाम :**

अर्थतज्ज्ञांच्या मते, GST २.० मुळे देशांतर्गत खरेदीवाढ, गुंतवणुकीत वाढ आणि उत्पादनक्षमता वृद्धिंगत होणार आहे. उद्योगांना लागणाऱ्या कच्च्या मालावरील करदर कमी झाल्याने खर्च घटेल व उत्पादन स्वस्त होईल. परिणामी देशातील उत्पादनक्षमता वाढून निर्यातीस गती मिळेल. वित्तीय बाजारातही या सुधारणांचा सकारात्मक परिणाम दिसून आला आहे. निफ्टी आणि सेंसेक्समध्ये झपाट्याने वाढ होऊन उद्योगविश्वाचा विश्वास वाढल्याचे संकेत मिळाले आहेत.

- **दूरगामी परिणामांची अपेक्षा :**

सरकारला विश्वास आहे की या सुधारणांमुळे उद्योगविश्वाला चालना मिळेल, ग्राहकांची क्रयशक्ती वाढेल आणि एकूणच देशाच्या अर्थव्यवस्थेला गती मिळेल. कररचना सुलभ झाल्यामुळे करचुकवेगिरीत घट येईल आणि महसूल स्थिर राहील, असा अंदाज वर्तवला जात आहे.

GST २.० हे केवळ करसुधारणा नसून उद्योग, व्यापार, कृषी व सेवाक्षेत्रासाठी एक दूरगामी धोरणात्मक पाऊल आहे. यामुळे ग्राहकांनाही स्वस्ताईची भेट मिळणार असून उद्योजकांना विकासाची संधी उपलब्ध होणार आहे. २२ सप्टेंबर २०२५ हा दिवस भारताच्या करप्रणालीच्या इतिहासातील महत्त्वाचा टप्पा ठरणार आहे, याबाबत तज्ज्ञ एकमताने भाष्य करीत आहेत.

# जीएसटी सुधारणांचे महाराष्ट्र चेंबरकडून स्वागत

## महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेला अधिक चालना मिळेल : ललित गांधी



महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्रीज अँड ॲग्रिकल्चर (MCCIA) ने केंद्र सरकारच्या ऐतिहासिक जीएसटी सुधारणांचे स्वागत केले आहे. केंद्र सरकारचे ग्राहक, व्यापारी आणि उद्योगांसाठी दिलासा देणारे पाऊल आहे. या निर्णयामुळे महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेला अधिक चालना मिळेल, असे मत महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी व्यक्त केले.

केंद्र सरकारने नुकतीच जीएसटी करप्रणाली चार टप्प्यांऐवजी दोन टप्प्यात करण्याचा निर्णय घेतला. या पार्श्वभूमीवर ललित गांधी म्हणाले की, जीएसटी कररचना ५% आणि १८% अशा दोन मुख्य दरांमध्ये साधी-सोपी करणे तसेच जीवनावश्यक वस्तू व औषधे करमुक्त करणे हे महाराष्ट्रातील कोट्यवधी ग्राहकांसाठी मोठा दिलासा आहे. ते म्हणाले, व्यापारी व किरकोळ व्यावसायिक विशेषतः छोट्या व्यापाऱ्यांना या निर्णयामुळे कर भरण्यास आणि कर परतावा मिळवण्यास सोपे जाईल. चार टप्प्यातील कर प्रणालीमुळे कर विभाग आणि करदाते यांच्यात होणारे वाद कमी होऊन बाजारपेठेतील व्यवहारात वाढ होईल.

नवीन कर रचनेमुळे उद्योगांवर होणाऱ्या परिणामाविषयी बोलताना गांधी म्हणाले की, महाराष्ट्रातील ऑटोमोबाईल, वस्त्र, फार्मा व एफएमसीजी अशा विविध क्षेत्रांमध्ये मागणी वाढेल. स्वाभाविकपणे पुरवठाही वाढेल आणि उत्पादन खर्चही कमी होईल. या सुधारणेमुळे आपल्या उद्योगांची स्पर्धात्मकता वाढेल, निर्यातदार व एमएसएमई यांना मोठा दिलासा मिळेल आणि उद्योग, व्यापार करणे अधिक सुलभ होईल, असेही ते म्हणाले.

या निर्णयामुळे सणासुदीच्या काळात वस्तू, विविध उत्पादनांना मागणी वाढेल. ग्राहकांचा आत्मविश्वास वाढेल आणि महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेवर चांगले परिणाम दिसून येतील. जगभरातील अनेक देशांमध्ये सध्या आर्थिक मंदीची चाहूल लागल्याचे दिसून येत आहे. या पार्श्वभूमीवर कर रचनेतील सुलभता देशाचा विकास वाढवणारी असेल, असेही म्हणाले.

## • स्वस्त होणाऱ्या वस्तू व सेवा •

**१) दैनंदिन उपयोगातील वस्तू (FMCG)**
साबण, शॅम्पू, टूथपेस्ट, टूथब्रश, पॅकेज्ड खाद्यपदार्थ (बिस्किटे, रेडी–टू–ईट पदार्थ) (पूर्वी १८% – आता ५% GST)

**२) खाद्यपदार्थ**
पनीर, रोटी, पराठा, UHT दूध, दही, ताक, पॅकेज्ड धान्य व डाळी. (पूर्वी ५% किंवा १२% फआता शून्य किंवा ५% GST)

**३) वाहन व घरगुती उपकरणे**
दोनचाकी व लहान कार (२८% - १८%)
टीव्ही (३२ इंचांवरील), एसी, डिशवॉशर (२८% - १८%)
सिमेंट (२८% - १८%)

**४) सेवाक्षेत्र**
जीवन व स्वास्थ्य विमा (१८% - शून्य GST)
हॉटेल (₹७,५०० पर्यंत खोली भाडे) (१२% - ५%)
जिम, योगा, सलून (१२% – ५%)

**५) शिक्षण व हस्तकला**
पेन्सिल, नोटबुक, इरेझर, शालेय साहित्य (०% GST)
हस्तकला व ग्रामीण उत्पादने (५% GST)

## • महाग होणाऱ्या वस्तू व सेवा •

**१) 'सिन प्रॉडक्ट्स'**
सिगारेट, गुटखा, पान मसाला, शीतपेये व एनर्जी ड्रिंक्स (पूर्वी २८% + सेस – आता ४०% GST)

**२) लक्झरी व उच्चभ्रू सेवा**
हॉटेल (₹७,५०० पेक्षा जास्त भाडे असलेल्या खोल्या)
मोठ्या कार व SUV (पूर्वीचा दर कायम किंवा वाढ)
काही लक्झरी इलेक्ट्रॉनिक्स व इम्पोर्टेड वस्तू

## • एकूण परिणाम •

• **स्वस्त होणारे क्षेत्र :** दैनंदिन उपयोगातील वस्तू, अन्नधान्य, वाहने, घरगुती उपकरणे, विमा, हॉटेल–पर्यटन, शिक्षण व MSME उत्पादने.

• **महाग होणारे क्षेत्र :** सिगारेट–गुटखा–ड्रिंक्ससारखी आरोग्याला घातक उत्पादने व लक्झरी सेवा.

# अमेरिकेच्या ५०% टेरिफनंतरही भारतीय शेअरबाजार मजबूत

अमेरिकेने भारतातील काही महत्त्वाच्या निर्यात वस्तूंवर ५० टक्क्यांपर्यंत आयात शुल्क (टेरिफ) लावल्यानंतर देशातील उद्योगक्षेत्र आणि शेअरबाजारसमोर मोठे आव्हान उभे राहिले. सुरुवातीला या निर्णयामुळे गुंतवणूकदारांमध्ये संभ्रम निर्माण झाला. आयटी, औषध, वस्त्र व अभियांत्रिकी क्षेत्रात निर्यात कमी होण्याची भीती व्यक्त केली गेली. बाजारात काही काळ तीव्र चढ–उतार झाले.



मात्र, भारतीय शेअरबाजाराने केवळ हा धक्का सहन केला नाही, तर काही महिन्यांत स्थैर्य आणि वाढ या दोन्हीचा अनुभव दिला. या घडामोडीतून एक गोष्ट ठळकपणे समोर आली की भारतीय अर्थव्यवस्थेचा पाया आता एवढा मजबूत झाला आहे की जागतिक आव्हानांनाही तो समर्थपणे सामोरा जात आहे. टेरिफ लागू झाल्यानंतर पहिल्या आठवड्यात सेन्सेक्समध्ये जवळपास १५०० अंकांची घसरण झाली. निर्यात–आधारित कंपन्यांच्या समभागांमध्ये विक्री वाढली. निफ्टी आयटी निर्देशांकाला सर्वाधिक फटका बसला. परंतु हा काळ तात्पुरता ठरला. गुंतवणूकदारांनी लवकरच लक्षात आणले की भारतीय बाजाराचा मुख्य आधार केवळ निर्यात नसून देशांतर्गत मागणीही तितकीच मजबूत आहे. परिणामी, काही दिवसांतच बाजाराने तोटा भरून काढण्यास सुरुवात केली.

**• देशांतर्गत मागणीचा आधार**

भारतातील लोकसंख्या, वाढती शहरीकरण, डिजिटल क्रांती आणि सरकारकडून मिळणारा पायाभूत सुविधांचा पाठिंबा यामुळे देशांतर्गत मागणी सतत वाढत आहे. ऑटोमोबाईल, एफएमसीजी, बांधकाम आणि बँकिंग क्षेत्रातील समभागांनी गेल्या काही महिन्यांत लक्षणीय वाढ दाखवली. या क्षेत्रातील कंपन्यांना अमेरिकन टेरिफचा थेट फटका बसला नाही. त्यामुळे गुंतवणूकदारांनी निर्यात क्षेत्रातील तोटा भरून काढण्यासाठी याच क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक केली.

**• सरकारी उपाययोजना**

अमेरिकेच्या निर्णयाला प्रत्युत्तर म्हणून भारत सरकारने तातडीने चर्चा सुरू केली. विविध स्तरांवर झालेल्या संवादामुळे परिस्थिती नियंत्रणात राहिली. त्याचबरोबर सरकारने 'मेक इन इंडिया' आणि 'आत्मनिर्भर भारत' या धोरणांना अधिक गती दिली. उत्पादनाला प्रोत्साहन, निर्यातीसाठी नवीन बाजारपेठा शोधणे आणि लघु–मध्यम उद्योगांना सवलती अशा उपाययोजना करण्यात आल्या. यामुळे बाजारातील गुंतवणूकदारांचा आत्मविश्वास वाढला.

# अमेरिकेचे ५०% टेरिफः आव्हान की संधी?




**अमेरिकेने भारतावर लादलेल्या ५०% आयात करामुळे (Tariff) महाराष्ट्राच्या उद्योग, व्यापार आणि कृषी क्षेत्रावर नेमका काय परिणाम होईल, हा प्रश्न सध्या अनेकांना सतावतो आहे. हा निर्णय एक संकट घेऊन येईल की, आपल्यासाठी नवीन संधींचे दरवाजे उघडेल, याचा विचार करणे महत्त्वाचे आहे. कोणताही मोठा आंतरराष्ट्रीय आर्थिक बदल हा केवळ एकतर्फी परिणाम करत नाही, तर त्याचे अनेक पैलू असतात.**

---

● **उद्योगांवर परिणाम : आव्हान आणि अनुकूलता**

महाराष्ट्राचे उद्योग क्षेत्र हे देशाच्या आर्थिक विकासात नेहमीच आघाडीवर राहिले आहे. मुंबई, पुणे, औरंगाबाद, नाशिक, नागपूर ही शहरे विविध उद्योगांची प्रमुख केंद्रे आहेत. अमेरिकेने लादलेल्या या शुल्कामुळे या उद्योगांना निश्चितपणे काही तत्काळ धक्के बसतील.

● **वस्त्रोद्योग : भारताचा वस्त्रोद्योग, विशेषतः** तयार कपडे (Apparels), अमेरिकेच्या बाजारपेठेवर मोठ्या प्रमाणावर अवलंबून आहे. २५% शुल्क लागल्याने अमेरिकेतील भारतीय कपड्यांच्या किमती वाढतील, ज्यामुळे त्यांची मागणी कमी होईल. याचा थेट परिणाम महाराष्ट्रातील सोलापूर, इचलकरंजी आणि मालेगावसारख्या वस्त्रोद्योगाच्या केंद्रांवर होईल. अनेक लहान आणि मध्यम उद्योगांना (MSMEs) याचा मोठा फटका बसू शकतो. तसेच, पुण्यातील ऑटोमोबाईल उद्योगालाही या शुल्कामुळे फटका बसू शकतो. भारतीय वाहन कंपन्या अमेरिकेत मोठ्या प्रमाणात निर्यात करतात आणि वाढलेल्या शुल्कामुळे त्यांची स्पर्धात्मकता कमी होईल.

● **औषधनिर्माण** (Pharma) **क्षेत्र :**

महाराष्ट्रातील मुंबई आणि औरंगाबाद परिसरातील अनेक मोठ्या औषध कंपन्या (उदा. सिप्ला, ल्युपिन, कॅडिला) अमेरिकन बाजारात मोठ्या प्रमाणात जेनेरिक औषधांची निर्यात करतात. २५% शुल्क लागल्याने भारतीय जेनेरिक औषधे अमेरिकेत महाग होतील. यामुळे अमेरिकन कंपन्यांशी स्पर्धा करणे अधिक कठीण होईल. परिणामी, या कंपन्यांच्या महसुलावर आणि नफ्यावर नकारात्मक परिणाम होऊ शकतो, ज्यामुळे रोजगार निर्मितीवरही परिणाम होण्याची शक्यता आहे.

● **इलेक्ट्रॉनिक्स आणि सौर ऊर्जा क्षेत्रातील बदल :**

स्मार्टफोन, सौर पॅनेल आणि इतर इलेक्ट्रॉनिक्स उत्पादने तयार करणाऱ्या कंपन्यांनाही या शुल्कामुळे किंमती आणि मागणीच्या दबावाला सामोरे जावे लागू शकते. या क्षेत्रांमधील मार्जिन (नफा) आधीच कमी असल्याने, वाढीव शुल्क त्यांच्यासाठी एक मोठे आव्हान ठरू शकते.

● **रत्ने आणि दागिने उद्योग :**

महाराष्ट्रातून अमेरिकेला होणाऱ्या रत्ने आणि दागिन्यांच्या निर्यातीवरही या शुल्काचा परिणाम होईल. निर्यातदारांना एकतर वाढीव शुल्क स्वतः उचलावे लागेल, ज्यामुळे त्यांचा नफा कमी होईल, किंवा त्यांना नवीन बाजारपेठा शोधाव्या लागतील.

● **लघु आणि मध्यम उद्योग** (MSMEs) **:**

महाराष्ट्रातील अनेक MSMEs निर्यात-आधारित आहेत. त्यांच्यासाठी २५% शुल्क हा मोठा आर्थिक भार ठरू शकतो. भांडवलाची कमतरता आणि कमी मार्जिनमुळे त्यांना बाजारपेठेतील बदलांना जुळवून घेणे अधिक कठीण जाईल.

● **व्यापार क्षेत्रावर दुहेरी परिणाम: संकोच आणि विस्तार :**

**निर्यात घट:** अमेरिकेत भारतीय उत्पादने महाग झाल्यामुळे तेथील मागणी कमी होईल. याचा थेट परिणाम महाराष्ट्रातील निर्यातदारांवर होईल. यामुळे विशेषतः जे निर्यातदार केवळ अमेरिकन बाजारपेठेवर अवलंबून आहेत, त्यांना मोठा फटका बसेल.

**आयात वाढीचा धोका:** जरी भारताने अमेरिकन वस्तूंवर तितकेच शुल्क लावले नाही, तरी जर अमेरिकेने आपल्या उत्पादनांना स्वस्त केले, तर अमेरिकेतून होणारी आयात वाढू शकते. यामुळे स्थानिक उद्योगांना त्यांच्या उत्पादनांसाठी अमेरिकेशी स्पर्धा करावी लागेल, ज्यामुळे काही स्थानिक उद्योगांना नुकसान होऊ शकते.

**रोजगारावर परिणाम:** निर्यातीत घट झाल्यामुळे उद्योगांमध्ये कामगारांची मागणी कमी होऊ शकते. यामुळे काही प्रमाणात बेरोजगारी वाढण्याची शक्यता आहे. विशेषतः कुशल आणि अर्धकुशल कामगारांवर याचा परिणाम होईल.

● **कृषी क्षेत्रावर सूक्ष्म परिणाम: संधींचा शोध :**

निर्यात आणि स्पर्धेचा प्रश्न: नाशिकमधून अमेरिकेला द्राक्षे आणि डाळिंब निर्यात केली जातात. कृषी उत्पादनांवर कमी शुल्क लागत असले तरी, एकूण व्यापार तणावामुळे काही प्रमाणात परिणाम होऊ शकतो. वाढीव शुल्कामुळे भारतीय कृषी उत्पादने अमेरिकन बाजारपेठेत महाग होऊन त्यांची स्पर्धात्मकता कमी होऊ शकते.

अमेरिकेचा दबाव भारतीय शेतमाल आणि दुग्धजन्य पदार्थांवरील आयात शुल्क कमी करण्यासाठी आहे. जर भारत अमेरिकेच्या दबावाला बळी पडला आणि अमेरिकेच्या कृषी उत्पादनांवरील आयात शुल्क कमी केले, तर महाराष्ट्रातील दुग्धव्यवसाय आणि कुक्कुटपालन उद्योगाला धोका निर्माण होऊ शकतो. अमेरिकेची स्वस्त कृषी उत्पादने भारतात उपलब्ध झाल्यामुळे स्थानिक शेतकऱ्यांवर किंमतीचा दबाव वाढू शकतो.

● **संकट की संधी? भविष्याचा वेध :**

अमेरिकेने लादलेले हे शुल्क तात्पुरत्या स्वरूपात महाराष्ट्रासाठी एक मोठे आव्हान ठरू शकते. मात्र, प्रत्येक आव्हानात एक संधी दडलेली असते. हा निर्णय महाराष्ट्रासाठी दीर्घकाळात नवीन संधींचा महामार्ग ठरू शकतो, जर आपण योग्य धोरणे आणि दूरदृष्टीने काम केले.

**नवीन बाजारपेठांचा शोध:** अमेरिकेवरील अवलंबित्व कमी करण्यासाठी भारताला युरोप, आफ्रिका, आग्नेय आशियाई देश आणि मध्य पूर्वेकडील देशांसारख्या नवीन बाजारपेठांचा शोध घ्यावा लागेल. महाराष्ट्रातील उद्योगांसाठी ही नवीन बाजारपेठा शोधण्याची, आंतरराष्ट्रीय स्तरावर आपले अस्तित्व निर्माण करण्याची एक मोठी संधी असेल.

**देशांतर्गत उत्पादनाला चालना ('मेक इन महाराष्ट्र'):** मेक इन इंडिया' आणि 'आत्मनिर्भर भारत' यासारख्या मोहिमांना यामुळे अधिक बळ मिळेल. भारतीय उद्योगांना देशांतर्गत उत्पादनांवर अधिक लक्ष केंद्रित करावे लागेल, ज्यामुळे देशांतर्गत मागणी वाढू शकते आणि भारतीय उत्पादनांची गुणवत्ता वाढवण्यास प्रोत्साहन मिळेल.

**उत्पादन विविधता आणि संशोधन:** भारतीय उद्योगांना आता फक्त अमेरिकेच्या बाजारपेठेवर अवलंबून न राहता आपल्या उत्पादनांमध्ये विविधता आणण्याची गरज निर्माण होईल. नवीन उत्पादने विकसित करणे आणि संशोधन व विकासावर (RD) अधिक लक्ष केंद्रित करणे महत्त्वाचे ठरेल.

● **व्यापार करारांवर पुनर्विचार आणि मजबुतीकरण:**

भारताला इतर देशांशी नवीन व्यापार करार करण्यावर आणि सध्याच्या करारांचे पुनरावलोकन करण्यावर भर द्यावा लागेल. यामुळे भारताचे जागतिक व्यापार संबंध अधिक मजबूत होतील.

**आंतरराष्ट्रीय संबंधांमध्ये बदल:** भारताला रशियासारख्या देशांशी असलेले आपले व्यापार संबंध मजबूत ठेवावे लागतील, कारण अमेरिकेने भारतावर शुल्क लावण्याचे एक कारण भारत आणि रशियामधील वाढलेले व्यापारी संबंध हे देखील सांगितले जात आहे. यामुळे भारताची भू-राजकीय आणि आर्थिक रणनीती अधिक लवचिक होईल.

**स्थानिक पुरवठा साखळीचे बळकटीकरण:** आंतरराष्ट्रीय व्यापार तणावामुळे स्थानिक पुरवठा साखळी (Supply Chain) मजबूत करण्याची गरज अधोरेखित होते. महाराष्ट्रातील उद्योगांना त्यांच्या कच्च्या मालासाठी आणि घटकांसाठी देशांतर्गत स्त्रोतांवर अधिक अवलंबून राहण्यास प्रोत्साहन मिळेल.

थोडक्यात सांगायचे झाल्यास, अमेरिकेच्या ५०% शुल्कामुळे महाराष्ट्रातील उद्योगांना काही प्रमाणात अडचणींचा सामना करावा लागेल, हे निश्चित. परंतु, यातून नवीन बाजारपेठा शोधण्याची, देशांतर्गत उत्पादन वाढवण्याची, आणि जागतिक व्यापार धोरणांमध्ये बदल घडवण्याची एक मोठी संधीही उपलब्ध झाली आहे. भारताला या परिस्थितीतून मार्ग काढण्यासाठी आणि या संधींचे सोने करण्यासाठी योग्य धोरणात्मक निर्णय घेणे, उद्योगांना आवश्यक ती मदत पुरवणे, आणि संशोधनावर भर देणे महत्त्वाचे ठरेल. महाराष्ट्राच्या विकासासाठी हा एक महत्त्वाचा टप्पा ठरू शकतो, जो आपल्याला अधिक आत्मनिर्भर आणि जागतिक स्तरावर अधिक स्पर्धात्मक बनवेल.

■■

# शेतकऱ्यांचे हित हेच आमचे सर्वोच्च प्राधान्य

## वाढीव व्यापार शुल्कावर पंतप्रधान मोदी यांचे ट्रम्प यांना जोरदार प्रत्युत्तर

अमेरिका–भारत संबंधांमध्ये तणाव वाढत असताना, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अमेरिकेने लादलेल्या वाढीव व्यापार शुल्कावर तीव्र प्रतिक्रिया दिली. सुश्री स्वामीनाथन शताब्दी आंतरराष्ट्रीय परिषदेत बोलताना त्यांनी स्पष्ट केले की, भारत आपल्या शेतकऱ्यांच्या हिताचे रक्षण करण्यासाठी कोणतीही किंमत मोजायला तयार आहे.

पंतप्रधान मोदी म्हणाले की, आमच्यासाठी आमच्या शेतकऱ्यांचे हित हे आमचे सर्वोच्च प्राधान्य आहे. भारत कधीही शेतकरी, मच्छीमार आणि दुग्ध उत्पादक शेतकऱ्यांच्या हिताशी तडजोड करणार नाही. वाढलेल्या शुल्कामुळे वैयक्तिक पातळीवर मोठी किंमत मोजावी लागेल याची जाणीव असूनही, मोदींनी ठामपणे सांगितले की, भारत त्यासाठी तयार आहे,.

**केंद्र सरकारची प्रतिक्रिया :** भारत सरकारने या शुल्काला अन्यायकारक, अयोग्य आणि अवास्तव म्हटले आहे. तसेच, आपल्या राष्ट्रीय हिताचे रक्षण करण्यासाठी आवश्यक सर्व कृती करण्याचे वचन दिले आहे. रशियन युरेनियम, पॅलेडियम आणि खत खरेदी करणे सुरू ठेवत असताना, रशियन तेलाच्या आयातीवर अमेरिकेच्या दुहेरी भूमिकेवरही भारताने टीका केली आहे.

**ट्रम्प यांची कठोर भूमिका:** अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतावर २५ टक्के अतिरिक्त शुल्क लादले आहे, ज्यामुळे एकूण शुल्क ५० टक्क्यांपर्यंत पोहोचले आहे. अमेरिकेने कोणत्याही देशावर लादलेले हे सर्वाधिक शुल्क आहे. रशियन तेल आणि लष्करी उपकरणे खरेदी करण्याच्या भारताच्या निर्णयामुळे ही कारवाई करण्यात आल्याचे मानले जाते. ट्रम्प यांनी भारताला मित्र म्हटले असले तरी, मॉस्कोसोबतच्या संबंधांसाठी दंड (penalty) देण्याचा इशारा दिला होता.

**राजकीय आणि आर्थिक परिणाम :** अमेरिकेने भारतावर लादलेल्या शुल्काकडे अनेक दृष्टीकोनातून पाहिले जाते, ज्यामुळे दोन्ही देशांमधील संबंधांवर गंभीर परिणाम होत आहेत. **राजकीय संबंधांवरील परिणाम:** रशियाकडून तेल आणि लष्करी उपकरणे खरेदी करण्याच्या भारताच्या धोरणामुळे अमेरिका नाराज आहे.



अमेरिकेच्या या कारवाईला रशियन संबंधांसाठी थेट शिक्षा म्हणून पाहिले जात आहे.

**व्यापार करारातील अडथळे:** केंद्र सरकारने नवी कृषी बाजारपेठेतील प्रवेश आणि डिजिटल व्यापार नियमांवर सहमती दर्शवण्यास नकार दिल्यानंतर द्विपक्षीय व्यापार कराराच्या वाटाघाटी थांबल्या होत्या. अमेरिकेचे हे शुल्क त्या निराशेचेच प्रतिबिंब असल्याचे मानले जाते.

**भारतीय उद्योगांवर परिणाम:** विश्लेषकांच्या मते, या वाढलेल्या शुल्कामुळे भारताच्या वस्त्रोद्योग, फार्मास्युटिकल्स आणि प्रक्रिया केलेल्या खाद्यपदार्थ यांसारख्या महत्त्वाच्या क्षेत्रांना मोठा फटका बसू शकतो, कारण ही क्षेत्रे भारताच्या निर्यातीमध्ये महत्त्वपूर्ण योगदान देतात.

> “आमच्यासाठी, आमच्या शेतकऱ्यांचे हित हे आमचे सर्वोच्च प्राधान्य आहे. शेतकरी, मच्छीमार आणि दुग्धोत्पादक शेतकऱ्यांच्या हितासाठी भारत कधीही तडजोड करणार नाही. मला माहीत आहे की त्यासाठी मला वैयक्तिकरित्या मोठी किंमत मोजावी लागेल आणि मी त्यासाठी तयार आहे. भारत त्यासाठी तयार आहे.
>
> **– नरेंद्र मोदी, पंतप्रधान**

> “आता केवळ काही दिवस झाले आहेत. यापुढे काय होते ते पाहूया. तुम्ही बरेच काही पाहणार आहात. आगामी काळात तुम्ही अनेक क्षेत्रासाठी दुय्यम मंजुरी पाहणार आहात.
>
> **– डोनाल्ड ट्रम्प, राष्ट्राध्यक्ष अमेरिका**

### पुढील पावले काय ?

**पहिली २५ टक्के शुल्कवाढ, ७ ऑगस्टपासून लागू झाली आहे, तर दुसरी फेरी २१ दिवसांत लागू होणार आहे. यामुळे दोन्ही देशांमध्ये तणाव वाढला आहे आणि निर्यातदार तसेच उद्योजक चिंतेत आहेत. आता दोन्ही देशांकडून पुढील पावले काय उचलली जातात, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. या परिस्थितीमुळे दोन्ही देशांमधील संबंध त्यांच्या सर्वात कमी पातळीवर पोहोचले आहेत, ज्यामुळे जागतिक व्यापारावरही परिणाम होण्याची शक्यता आहे.**

# भारतीय आहोत, भारतीयच वापरु!

## महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सचा क्रांती दिनानिमित्त निर्धार ; उद्योग, व्यापार, कृषी क्षेत्राला धैर्य आणि स्वावलंबनाचा संदेश

**मुंबई, ९ ऑगस्ट : अमेरिकेने भारतावर ५० टक्के कर लादल्याच्या निर्णयामुळे संपूर्ण देशातच नव्हे, तर महाराष्ट्रातील उद्योग, व्यापार आणि कृषी क्षेत्रातही मोठी खळबळ उडाली आहे. याचा थेट परिणाम निर्यात, आयात, गुंतवणूक आणि उत्पादन यांवर होणार असल्याची तज्ज्ञांची भीती आहे. मात्र, या आव्हानाला संधी मानत महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, ने आत्मनिर्भर भारत या संकल्पनेला बळ देण्यासाठी भारतीय आहोत, भारतीयच वापरु हा जनजागृती अभियानाचा नारा दिला आहे.**

**अभियानाची वैशिष्ट्ये :**

- पूर्णपणे भारतीय बनावटीच्या वस्तूंचा वापर
- भारतीय खाद्यपदार्थ, साहित्य, जीवनावश्यक वस्तूंना प्राधान्य
- स्थानिक उद्योग, शेतकरी आणि कारागीर यांना थेट लाभ
- परकीय वस्तूंवरील अवलंबित्व कमी करणे
- ग्राहकांमध्ये देशभक्ती व आर्थिक स्वावलंबनाची भावना दृढ करणे

**अमेरिकेच्या करवाढीचा परिणाम :** अमेरिकेने भारतातून होणाऱ्या काही निर्यात उत्पादनांवर ५०% पर्यंत कर वाढवला आहे. या निर्णयामुळे खास करून महाराष्ट्रातील कृषी उत्पादन निर्यातदार, लघु व मध्यम उद्योग, आणि कापड-उद्योग क्षेत्रावर ताण येणार आहे.

**कृषी क्षेत्रावर परिणाम:** द्राक्ष, आंबा, डाळिंब, ऊसजन्य उत्पादने, मसाले यांची अमेरिका बाजारपेठेत मागणी आहे. वाढलेल्या करामुळे हे उत्पादन तिथे महाग होईल, आणि स्पर्धात्मकतेत घट होईल.

**औद्योगिक क्षेत्रावर परिणाम:** मशीनरी, ऑटो पार्टस्, केमिकल्स, वस्त्रोद्योगातील उत्पादनांवर परिणाम होईल. लघु उद्योगांना खर्चात वाढ सहन करावी लागेल.

**व्यापार क्षेत्रावर परिणाम:** आयात-निर्यात व्यवहारात अडथळे येतील. व्यापाऱ्यांना नवे बाजार शोधावे लागतील.

**अभियानाचे उद्दिष्ट :**

- **स्थानिक उत्पादनांचा प्रसार :** महाराष्ट्रातील उद्योग आणि शेतकऱ्यांचे उत्पादन थेट ग्राहकांपर्यंत पोहोचवणे.
- **आयातीवरील अवलंबित्व कमी करणे :** अमेरिकन,चीन व इतर परदेशी वस्तूंऐवजी भारतीय वस्तूंची खरेदी.
- **नव्या बाजारपेठांचा शोध :** आफ्रिका, आग्नेय आशिया, मध्यपूर्व देशांमध्ये निर्यातीस चालना.
- **ग्राहक जनजागृती :** भारतीय वस्तूंच्या गुणवत्तेबाबत जागरूकता.

> “ अमेरिकेच्या करवाढीने आम्ही डगमगणार नाही. उलट हा प्रसंग भारतातील उत्पादन आणि बाजारपेठ मजबूत करण्याची संधी आहे. महाराष्ट्रातील उद्योग, व्यापार आणि कृषी उत्पादकांना आम्ही सर्वतोपरी मदत करू
>
> **– ललित गांधी, अध्यक्ष**
> महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स

**अभियानातील प्रमुख मुद्दे:**

- मेक इन इंडियाला चालना
- महाराष्ट्रातील ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळकटी
- लघु व मध्यम उद्योगांना नवे प्रोत्साहन
- शेतकऱ्यांना जागतिक स्पर्धेत टिकण्यासाठी मदत
- ग्राहकांचा देशी उत्पादनावर विश्वास वाढवणे

**'भारतीय आहोत, भारतीयच वापरु' : पाच पावले**

- भारतीय वस्तूंना प्राधान्य द्या.
- स्थानिक शेतकरी व कारागीर यांचा माल खरेदी करा.
- परकीय ब्रँडना पर्याय शोधा.
- उत्पादनाचा स्रोत तपासा.
- 'आत्मनिर्भर भारत' मोहिमेत सहभागी व्हा.

अमेरिकेच्या करवाढीने महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेवर दबाव आणला आहे, पण **''भारतीय आहोत, भारतीयच वापरु''** या जनजागृती मोहिमेमुळे हे संकट संधीमध्ये बदलण्याची क्षमता आहे. उद्योग, व्यापारी, शेतकरी आणि ग्राहक यांनी एकत्र येऊन देशी उत्पादनांचा स्वीकार केला, तर महाराष्ट्र केवळ या संकटातून सावरू शकत नाही, तर आत्मनिर्भर भारताच्या निर्मितीतही अग्रगण्य ठरू शकतो.



# भारत-ब्रिटन CET : ऐतिहासिक करार; नव्या आर्थिक युगाची नांदी



◆ लंडन : व्यापार करारावर स्वाक्षरी करताना केंद्रीय वाणिज्य मंत्री पियुष गोयल आणि युकेचे व्यवसाय आणि व्यापार राज्य सचिव जोनाथन रेनॉल्ड्स.

भारत आणि युनायटेड किंगडम यांच्यात नुकताच झालेला सर्वसमावेशक आर्थिक आणि व्यापार करार (Comprehensive Economic and Trade greement - CET) हा दोन्ही देशांच्या आर्थिक संबंधांतील एक मैलाचा दगड ठरेल. अनेक वर्षांच्या गहन वाटाघाटी आणि विचार-विनिमयानंतर दोन्ही देशांनी या ऐतिहासिक करारावर सहमती दर्शवली. हा करार केवळ दोन देशांमधील व्यापारी संबंधांना बळकट करणार नाही, तर तो जागतिक अर्थव्यवस्थेतील भारत आणि ब्रिटनचे स्थान आणखी मजबूत करेल. 'ब्रेक्झिट'नंतर ब्रिटनसाठी झालेला हा सर्वात मोठा व्यापार करार आहे, तर भारतासाठी कोणत्याही विकसित पाश्चात्त्य देशासोबत झालेला हा पहिलाच महत्त्वाचा करार आहे. या करारामुळे द्विपक्षीय व्यापार, गुंतवणूक, रोजगार निर्मिती आणि सेवा क्षेत्रात अभूतपूर्व वाढ होण्याची अपेक्षा आहे, ज्यामुळे दोन्ही देशांच्या अर्थव्यवस्थांना एक नवीन दिशा मिळेल.

● **CET कराराचे उद्दिष्ट आणि त्याचे व्यापक महत्त्व:**

या कराराचे मुख्य उद्दिष्ट दोन्ही देशांमधील वार्षिक व्यापार सध्याच्या सुमारे ५६ अब्ज डॉलरवरून २०३० पर्यंत दुप्पट करण्याचे आहे. हे महत्त्वाकांक्षी उद्दिष्ट साध्य करण्यासाठी कराराने अनेक महत्त्वाच्या तरतुदी केल्या आहेत. हा करार केवळ वस्तू आणि सेवांच्या व्यापारापुरता मर्यादित नसून, तो गुंतवणूक, बौद्धिक संपदा अधिकार, स्पर्धा धोरणे आणि कामगारांच्या गरजा अशा विविध आयामांना स्पर्श करतो. यामुळे, हा करार दोन्ही देशांसाठी 'गेम चेंजर' ठरू शकतो.

✻ **कराराचे मुख्य स्तंभ: उत्पादन आणि सेवा क्षेत्रातील व्यापार सुलभता:** दोन्ही देशांमधील उत्पादनांवरील आणि सेवांवरील आयात शुल्क कमी करणे किंवा पूर्णपणे हटवणे.

✻ **गुंतवणुकीला प्रोत्साहन:** दोन्ही देशांतील कंपन्यांना सुलभ व्यापार आणि गुंतवणुकीसाठी अनुकूल वातावरण निर्माण करणे. रोजगार निर्मिती आणि कुशल कामगारांना संधी: भारतीय कुशल कामगारांना ब्रिटनमध्ये काम करण्यासाठी सोप्या अटी आणि परवाने देणे.

✻ **आर्थिक सहयोग:** तंत्रज्ञान हस्तांतरण, बौद्धिक संपदा संरक्षण आणि इतर महत्त्वाच्या क्षेत्रांमध्ये सहकार्य वाढवणे.

● **भारतासाठी CET करारातील फायदे:**

हा करार भारताच्या अर्थव्यवस्थेसाठी एक मोठी संधी घेऊन आला आहे.

(पुढील पानावर)

## भारत-ब्रिटन मुक्त व्यापार कराराचे स्वागत : ललित गांधी



भारत आणि ब्रिटन सरकारांनी या ऐतिहासिक करारावर स्वाक्षरी केली आहे. यामुळे दोन्ही देशांमध्ये व्यापार, गुंतवणूक आणि सेवा क्षेत्रात नवे आणि आकर्षक संधी निर्माण होणार आहेत. महाराष्ट्र, ज्याचे औद्योगिक वातावरण आणि नवोन्मेषक उद्योग हे जगभर ओळखले जाते, हा करार राज्यातील MSME, उत्पादक आणि निर्यातदारांसाठी एक मोलाची संधी आहे, असेही गांधी म्हणाले.

या करारामुळे भारताच्या ९९% निर्यातीवर शंभर टक्के शुल्क माफी मिळेल. भारताला ब्रिटनच्या उद्योगांमध्ये गुंतवणूक वाढवता येईल. औद्योगिक निर्मिती, इन्फ्रास्ट्रक्चर, आणि टिकाऊतावादी प्रकल्प, व्यावसायिक व्यावसायिकतेला संधी मिळेल. या सर्वांचा महाराष्ट्रातील औद्योगिक क्षेत्राला फायदा होईल. हा करार केवळ टॅरिफ कमी करणेच नाही, तर सर्वांगिण विकास, टिकाऊ नवकल्पनांची निर्मिती आणि परस्पर समृद्धीची एक पायवाट आहे. महाराष्ट्रातील उद्योगक्षेत्र या संधीचा पुरेपूर लाभ घेऊ शकते, असेही गांधी म्हणाले.

विशेषतः, 'मेक इन इंडिया' आणि 'आत्मनिर्भर भारत' यांसारख्या उपक्रमांना यामुळे मोठा पाठिंबा मिळेल.

**१. निर्यात शुल्कात सूट आणि जागतिक बाजारपेठेतील स्थान**

या करारानुसार, भारतातून ब्रिटनला निर्यात होणाऱ्या सुमारे ९९% उत्पादनांवर कोणतेही कर (टॅरिफ) लागणार नाहीत. यामुळे भारतीय उत्पादने ब्रिटनच्या बाजारपेठेत अधिक स्पर्धात्मक बनतील.

**वस्त्रोद्योग आणि तयार कपडे:** हा उद्योग भारतातील लाखो लोकांना रोजगार देतो. शुल्कात सूट मिळाल्यामुळे भारतीय कपड्यांची मागणी ब्रिटनमध्ये वाढेल.

पादत्राणे आणि चामड्याची उत्पादने, या क्षेत्रातील उत्पादनांवरील कर हटवल्यामुळे निर्यात वाढेल.

ऑटोमोबाईल्स आणि ऑटो या उद्योगांनाही मोठी संधी मिळेल.

भारतीय रत्ने आणि दागिने कारागिरांच्या कौशल्याला जागतिक स्तरावर मोठी मागणी मिळेल, कारण यावरील आयात शुल्क कमी होईल. भारतीय फर्निचर आणि हस्तकला उत्पादनांना आंतरराष्ट्रीय स्तरावर नवीन बाजारपेठ मिळेल.

**२. कृषी क्षेत्राला मिळणारे मोठे लाभ**

भारतीय कृषी उत्पादने आणि प्रक्रिया केलेल्या खाद्यपदार्थांवरील आयात शुल्क पूर्णपणे हटवले जाईल. यामुळे भारतीय शेतकरी आणि कृषी उद्योगाला मोठा फायदा होईल.

भारतीय आंबा, द्राक्षे, आणि इतर फळांना ब्रिटनमध्ये अधिक सहज आणि कमी दरात प्रवेश मिळेल.

भारतीय मसाले आणि चहा यांसारख्या पारंपरिक उत्पादनांची मागणी वाढेल. भारतीय प्रक्रिया केलेले खाद्यपदार्थ, जसे की तयार जेवण आणि स्नॅक्स, यांना ब्रिटनच्या बाजारपेठेत मोठी संधी मिळेल.

**३. सेवा क्षेत्रातील संधींचा विस्तार आणि व्यावसायिक विकासाला चालना**

आजच्या डिजिटल युगात, सेवा क्षेत्र भारताच्या अर्थव्यवस्थेचा एक महत्त्वाचा स्तंभ बनले आहे. या कराराने सेवा क्षेत्रातील भारतीय व्यावसायिकांसाठी नवीन संधींचे दार उघडले आहे. माहिती तंत्रज्ञान (IT) आणि ITES भारतीय खढ कंपन्यांना ब्रिटनमध्ये आपली सेवा अधिक सहजतेने आणि कमी खर्चात देण्यासाठी मदत होईल.

वित्तीय आणि अभियांत्रिकी सेवा या क्षेत्रातील व्यावसायिकांना ब्रिटनमध्ये काम करण्यासाठी आणि नवीन व्यवसाय सुरू करण्यासाठी अधिक सोपे होईल. भारतीय कायदेतज्ज्ञ आणि सल्लागारांना ब्रिटनमध्ये आपली सेवा देण्याची संधी मिळेल. यामुळे भारतीय व्यावसायिकांच्या कौशल्याला जागतिक स्तरावर मान्यता मिळेल.

**४. कुशल कामगारांसाठी वर्क परमिट आणि सामाजिक सुरक्षा**

हा करार भारतीय कुशल कामगारांसाठी विशेषतः फायदेशीर आहे. या करारातील तरतुदींमुळे त्यांना ब्रिटनमध्ये काम करणे सोपे होईल.

**३ वर्षांचे वर्क परमिट:** IT व्यावसायिक, चार्टर्ड अकाउंटंट्स आणि आर्किटेक्ट्स यांसारख्या कुशल कामगारांना ब्रिटनमध्ये ३ वर्षांचे तात्पुरते 'वर्क परमिट'मिळेल. यामुळे त्यांना कामासाठी सहज संधी मिळेल.

**योग प्रशिक्षक आणि संगीत व्यावसायिक:** योग आणि संगीत क्षेत्रातील व्यावसायिकांनाही अल्प-मुदतीचे परमिट मिळवणे सोपे होईल. ब्रिटनमध्ये तात्पुरत्या स्वरुपाचे काम करणाऱ्या भारतीय कामगारांना सामाजिक सुरक्षा शुल्कातून सूट दिली जाईल, ज्यामुळे त्यांची मोठी आर्थिक बचत होईल आणि त्यांच्या एकूण उत्पन्नात वाढ होईल. हा करार फक्त भारतासाठीच नव्हे, तर ब्रिटनसाठीही अत्यंत महत्त्वाचा आहे. या करारामुळे ब्रिटनच्या उत्पादनांना जगातील सर्वात मोठ्या बाजारपेठांपैकी एक असलेल्या भारतात प्रवेश मिळेल.

**१. आयात शुल्कात कपात आणि ग्राहकांसाठी स्वस्त वस्तू**

ब्रिटनमधून भारतात येणाऱ्या सुमारे ९०% वस्तूंवरील आयात शुल्क कमी होईल, ज्यामुळे अनेक उत्पादने भारतीयांना स्वस्त दरात मिळतील.

**मद्य :** ब्रिटनची प्रसिद्ध स्कॉच व्हिस्की आणि जिन वरील कर १५०% वरून ७५% पर्यंत कमी झाला आहे आणि पुढील १० वर्षांत तो ४०% पर्यंत खाली आणण्याचे उद्दिष्ट आहे. यामुळे ही पेये भारतात स्वस्त मिळतील आणि ग्राहकांसाठी उत्तम पर्याय उपलब्ध होतील.

**लक्झरी गाड्या:** ब्रिटनमधून आयात होणाऱ्या लक्झरी कार (उदा. जॅग्वार, लँड रोव्हर) वरील कर १००% वरून १०% पर्यंत कमी केला जाईल. यामुळे या गाड्यांची किंमत लक्षणीयरीत्या घटेल. मात्र, भारतीय वाहन उद्योगाचे संरक्षण करण्यासाठी एका वर्षात २५,००० 'लक्झरी कार' आयात करण्याची मर्यादा घालण्यात आली आहे.

**इतर उत्पादने :** या व्यतिरिक्त, ब्रिटनमधून येणारे मोबाईल, लॅपटॉप, शूज, फॅशनच्या वस्तू, सौंदर्यप्रसाधने, चॉकलेट्स, बिस्किटे आणि वैद्यकीय उपकरणे स्वस्त होण्याची शक्यता आहे.

CET कराराचे दूरगामी परिणाम आणि आव्हाने: हा करार दोन्ही देशांच्या अर्थव्यवस्थांसाठी एक 'गेम चेंजर' ठरू शकतो. यामुळे भारताला आपली निर्यात वाढवण्यासाठी आणि जागतिक व्यापारामध्ये आपले स्थान बळकट करण्यासाठी मोठी संधी मिळाली आहे. त्याचप्रमाणे, ब्रिटनला 'ब्रेक्झिट'नंतर युरोपियन युनियनबाहेर नवीन व्यापार भागीदार शोधण्यासाठी हा करार एक मैलाचा दगड ठरेल.

# कृषी क्षेत्रासाठी क्रांती आणि नवी दिशा
# भारताच्या आर्थिक विकासाला गती देणारे
## 'Income-tax (No. 2) Bill, 2025'

**१२ ऑगस्ट, २०२५ हा दिवस भारतीय अर्थव्यवस्थेच्या इतिहासात एका नव्या पर्वाची सुरुवात करणारा ठरला. अनेक दशकांपासून प्रलंबित असलेल्या कर सुधारणांना मूर्त स्वरूप देत, केंद्र सरकारने "Income-tax (No. 2) Bill, २०२५' संसदेच्या दोन्ही सभागृहांत संमत केले. या कायद्याने १९६१ च्या जुन्या आयकर कायद्याची जागा घेतली असून, तो १ एप्रिल, २०२६ पासून लागू होईल. या महत्त्वपूर्ण बदलामुळे कर प्रणाली अधिक सोपी, पारदर्शक आणि कार्यक्षम होईल, अशी अपेक्षा आहे. परंतु, या नव्या कायद्याचा उद्योग, व्यापार आणि कृषी क्षेत्रावर नेमका काय परिणाम होईल, हे समजून घेणे महत्त्वाचे आहे.**

**उद्योग आणि व्यापार क्षेत्रासाठी नवी पहाट :** हा नवा कायदा विशेषतः उद्योग आणि व्यापार क्षेत्रासाठी एक सकारात्मक पाऊल मानले जात आहे. जुन्या कायद्यातील किचकट कलमे आणि प्रक्रिया यामुळे अनेकदा व्यवसायांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता. नवीन कायद्यात ८१९ कलमांवरून ५३६ कलमांपर्यंत संख्या कमी केल्याने करदात्यांसाठी प्रक्रिया खूप सोपी झाली आहे. यामुळे व्यवसाय सुरू करणे, चालवणे आणि नियमांचे पालन करणे (Compliance) अधिक सुलभ होईल.

**"Ease of Doing Business' ला चालना:** या कायद्यामुळे सरकारचा 'Ease of Doing Business' चा उद्देश आणखी बळकट होणार आहे. करप्रणाली सोपी झाल्याने परदेशी आणि देशांतर्गत गुंतवणूकदार भारतामध्ये व्यवसाय सुरू करण्यास अधिक उत्सुक असतील.

**सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांसाठी (MSME) मोठा दिलासा:** नव्या कायद्यात MSME उद्योगांसाठी विशेष तरतुदी केल्या आहेत. यामुळे त्यांना सरकारी योजना आणि कर सवलतींचा लाभ घेणे सोपे जाईल.

**डिजिटायझेशनवर भर:** नव्या कायद्यात कर भरणा आणि इतर प्रक्रिया डिजिटल करण्याचे प्रोत्साहन देण्यात आले आहे. यामुळे कागदपत्रांचे काम कमी होऊन वेळ आणि पैसा वाचेल. या बदलांमुळे उद्योगांना आपले कामकाज अधिक कार्यक्षमतेने चालवता येईल. तसेच, टीडीएस (TDS) आणि इतर कर प्रक्रिया सुलभ झाल्यामुळे व्यवसायातील गुंतागुंत कमी होईल. कृषी क्षेत्रावरील परिणाम: अप्रत्यक्ष पण महत्त्वाचा भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा असलेल्या कृषी क्षेत्रावर या कायद्याचा थेट आणि मोठा परिणाम होणार नाही. कारण, कृषी उत्पन्न हे आयकर कायद्याच्या कलम १० नुसार करमुक्त आहे आणि ही तरतूद नव्या कायद्यातही कायम ठेवण्यात आली आहे. तरीही, या कायद्यातील काही बदल कृषी क्षेत्रावर अप्रत्यक्षपणे सकारात्मक परिणाम करू शकतात.

**कृषी उत्पन्नाचा गैरवापर रोखणे:** या कायद्यामुळे कृषी उत्पन्नाचा गैरवापर रोखण्यासाठी कठोर नियम लागू केले जाऊ शकतात. अनेकदा काळ्या पैशाला पांढरे करण्यासाठी कृषी उत्पन्नाचा गैरवापर केला जातो, असे तज्ज्ञांचे मत आहे. नव्या कायद्यात डिजिटल भूमी अभिलेखांच्या आधारावर उत्पन्नाची पडताळणी करण्याची यंत्रणा मजबूत होण्याची शक्यता आहे.

**आर्थिक सुलभता:** एकंदरीत, अर्थव्यवस्थेतील करप्रणाली सुलभ झाल्याने कृषी-संबंधित उद्योगांना आणि स्टार्टअप्सना आकर्षित करता येईल. त्यामुळे कृषी क्षेत्रात आधुनिक तंत्रज्ञान आणि गुंतवणुकीचा प्रवाह वाढेल.

याव्यतिरिक्त, नव्या कायद्यानुसार १२ लाख रुपयांपर्यंतचे वार्षिक उत्पन्न करमुक्त करण्यात आले आहे. यामुळे कृषी-संबंधित कामगार किंवा शेतकरी ज्यांचे उत्पन्न या मर्यादेत आहे, त्यांना कोणताही कर भरावा लागणार नाही. यामुळे त्यांच्या हातात अधिक पैसा शिल्लक राहील, ज्यामुळे ग्रामीण अर्थव्यवस्थेत खरेदीशक्ती वाढण्यास मदत मिळेल.

**नव्या कायद्यातील इतर महत्त्वाचे बदल:** या कायद्याने 'मागील वर्ष'आणि 'मूल्यांकन वर्ष'या गोंधळात टाकणाऱ्या संकल्पना काढून टाकून, त्याऐवजी 'कर वर्ष'(Tax year) ही एकच सोपी संकल्पना सुरू केली आहे. यामुळे करदात्यांचा गोंधळ कमी होईल. तसेच, वेळेवर आयकर विवरणपत्र (Income Tax Return) न भरणाऱ्या करदात्यांनाही आता परताव्याची मागणी (TDS refund) करण्याची परवानगी दिली आहे, जो एक मोठा दिलासा आहे.

# बंदर कायदा व भूमि नोंदी डिजिटायझेशन: राज्यातील उद्योग-व्यापार-कृषीला नवा वेग

## केंद्रीय मंत्रिमंडळाचा निर्णय; किनारी व्यापार, गुंतवणूक आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेला मिळणार ऐतिहासिक चालना

**महाराष्ट्र हे देशाच्या औद्योगिक, व्यापारी आणि कृषी नकाशावर अग्रस्थानी आहे. एकीकडे मुंबई, पुणे, नाशिक, नागपूरसारखे औद्योगिक व आयटी हब; तर दुसरीकडे कोकण ते विदर्भापर्यंत पसरलेली कृषीभूमी. या विविधतेला नवा वेग देण्यासाठी केंद्र सरकारने १२ ऑगस्ट २०२५ रोजी दोन महत्वाचे निर्णय घेतले. यात बंदर कायदा सुधारणा आणि भूमि नोंदी डिजिटायझेशन या निर्णयांचा समावेश आहे. हे दोन्ही निर्णय महाराष्ट्रासाठी केवळ सुधारणा नसून, विकासाच्या महामार्गावर आणखी एक गतीमान टप्पा आहे.**

**१. बंदर कायदा:**

**किनारी भूगोलाचा लाभ:** महाराष्ट्राचा ७२० किलोमीटर लांबीचा सागरी किनारा हा केवळ निसर्गसंपन्नच नाही तर आर्थिक दृष्ट्याही अत्यंत महत्त्वाचा आहे. मुंबई पोर्ट, जवाहरलाल नेहरू पोर्ट (नावा शेवा), रत्नागिरी, जयगड, विजयदुर्ग, रेडी, श्रीवर्धन यांसारखी प्रमुख व उपबंदरे राज्यातील व्यापाराचे मुख्य प्रवेशद्वार आहेत. सध्या महाराष्ट्राच्या निर्यात-आयात व्यवहारातील ६५% मालवाहतूक या बंदरांमार्फत होते.

**नवीन कायद्याने येणारे बदल:**

✻ डिजिटल आणि पारदर्शक प्रणाली, माल चढ-उतार, कस्टम तपासणी, आणि परवानग्या पूर्णपणे ऑनलाइन.

✻ **स्मार्ट पोर्ट टेक्नॉलॉजी :** GPS ट्रॅकिंग, स्वयंचलित क्रेन्स, ड्रोन सर्व्हिलन्स.

✻ **गुंतवणुकीसाठी सुलभता :** लॉजिस्टिक हब, गोदामे, कोल्ड स्टोरेज प्रकल्पांना करसवलत.

✻ **पर्यावरणपूरक उपाय :** हरित ऊर्जा वापर, कचरा व्यवस्थापन व सागरी प्रदूषण नियंत्रण.

**औद्योगिक व व्यापारी फायदा :** नवीन बंदर कायद्यामुळे औद्योगिक उत्पादनांची निर्यात वेगवान व खर्चिकदृष्ट्या स्वस्त होईल. ऑटोमोबाईल पार्टस्, इंजिनिअरिंग गुड्स, रसायने, औषधे, वस्त्रोद्योग उत्पादने तसेच कृषी प्रक्रिया माल (द्राक्षे, आंबा, डाळी) थेट परदेशी बाजारपेठेत वेळेत पोहोचतील.

**२. भूमि नोंदी डिजिटायझेशनचे फायदे :**

✻ **पारदर्शकता:** सातबारा, फेरफार, नकाशे, मालकी हक्क एकाच पोर्टलवर.

✻ **कर्ज व अनुदानासाठी गती:** बँका व शासकीय यंत्रणा थेट डिजिटल पडताळणी करू शकतील.

✻ **गुंतवणुकीसाठी स्पष्टता:** औद्योगिक प्रकल्पांना जमीन खरेदी/भाडेपट्ट्यावर घेणे सोपे.

✻ **वादांचे निराकरण:** जमिनीवरील न्यायालयीन प्रकरणांची संख्या कमी.

**तंत्रज्ञानाचा वापर :**

✻ ड्रोन सर्व्हे करून अचूक मोजणी.

✻ GIS नकाशे तयार करून ऑनलाइन उपलब्ध.

✻ मोबाईल ॲप्सद्वारे सातबारा उतारे व इतर माहिती सहज मिळेल.

● **उद्योग-व्यापार-कृषीतील परस्परपूरक परिणाम :**

**निर्यात वाढ :** भूमि नोंदी स्पष्ट असल्यामुळे शेतकरी थेट निर्यातदारांशी करार करू शकतील. बंदर कायद्यामुळे मालाची जलद वाहतूक होईल, त्यामुळे फळे-भाज्यांसारख्या लवकर नाशवंत मालाची गुणवत्ता टिकेल.

**गुंतवणुकीला चालना :** औद्योगिक कॉरिडॉर, अन्न-प्रक्रिया पार्क, आणि लॉजिस्टिक हब यांच्या विकासासाठी जमीन उपलब्धता व बंदर सुविधा या दोन्ही महत्त्वाच्या अडचणी दूर होतील.

**रोजगार संधी : किनारी भाग:** मासेमारी, शिपयार्ड, पर्यटन.

**गावागावात:** कृषी-प्रक्रिया उद्योग, कोल्ड स्टोरेज.

**शहरे:** लॉजिस्टिक्स, IT आधारित पोर्ट मॅनेजमेंट, GIS सर्व्हे सेवा.

**महाराष्ट्रासाठी दुहेरी लाभ :**

● **व्यापारात वेग:** जागतिक स्तरावर महाराष्ट्राच्या निर्यातदारांना विश्वासार्हता मिळेल.

● **कृषीत पारदर्शकता:** शेतकऱ्यांच्या हक्कांचे संरक्षण.

● **गुंतवणुकीची गती:** औद्योगिक प्रकल्प जलद सुरू होण्याची क्षमता.

● **तंत्रज्ञानाचा प्रसार:** डिजिटल सेवा ग्रामीण भागात पोहोचणे.

MAHARASHTRA STARTUP

महाराष्ट्र सरकारने राज्यातील तरुणांना उद्योग आणि स्टार्टअपच्या क्षेत्रात प्रोत्साहन देण्यासाठी मोठे पाऊल उचलले आहे. 'स्टार्टअप, उद्योजकता आणि नवोपक्रम धोरण-२०२५' अंतर्गत मुख्यमंत्री महा-फंडातून ५ ते १० लाख रुपयांपर्यंतचे कर्ज उपलब्ध करून दिले जाणार आहे. या उपक्रमामुळे पुढील पाच वर्षांत २५ लाख उद्योजक आणि ५० हजार स्टार्टअप्स उभारण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.

## मुख्य योजना आणि उपक्रम



### आर्थिक सहाय्य व कर्ज सुविधा

- स्टार्टअप्सना ५ ते १० लाखांचे कर्ज
- २% व्याजदराने सॉफ्ट लोन
- टर्म लोनसाठी मदत
- पायलट ऑर्डर्स, पेटंट, उत्पादन चाचणीसाठी निधी
- १०० एकर परिसरातील अत्याधुनिक केंद्र
- स्टार्टअप्स, कॉर्पोरेट्स, शैक्षणिक संस्था आणि शासन एकत्र संशोधन व नवोन्मेषाला चालना
- सूक्ष्म-इन्क्युबेटरची उभारणी
- आयटीआय, पॉलिटेक्निक, विद्यापीठांमध्ये स्थापन
- स्टार्टअप संस्कृतीचा प्रसार
- स्थानिक तरुणांना थेट सहभाग



### उद्दिष्टे :

- ग्रामीण, महिला आणि युवा उद्योजकतेला चालना
- स्थानिक वस्तू-उद्योगांना तंत्रज्ञानाची जोड
- जागतिक पातळीवर महाराष्ट्राचा ठसा उमटवणे

### सरकारी सहाय्य :




- प्रत्येक सरकारी विभागात नवोन्मेष निधी
- स्थानिक स्टार्टअप्सना प्रकल्पांमध्ये प्राधान्य
- विविध प्रशिक्षण आणि मार्गदर्शन केंद्रांची स्थापना

# महाराष्ट्र चेंबर पत्रिका शताब्दी महोत्सवी अंकाचे मुख्यमंत्र्यांच्या हस्ते प्रकाशन



◆ **मुंबई: महाराष्ट्र चेंबर पत्रिका शताब्दी महोत्सवी अंकाचे प्रकाशन करताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस. सोबत महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी आणि बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले.**

**मुंबई :** मंगळवार, दि. २९ जुलै रोजी महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सचे अध्यक्ष ललित गांधी यांनी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची सदिच्छा भेट घेतली. या भेटीदरम्यान महाराष्ट्र चेंबर पत्रिका शताब्दी महोत्सवी अंकाचे मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले.

यावेळी राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले उपस्थित होते. या प्रसंगी ललित गांधी यांनी महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सच्या कार्याचा आढावा सादर केला. त्यांनी उद्योग, व्यापार आणि सेवा क्षेत्राशी संबंधित सध्याच्या घडामोडी, आव्हाने व संधी याबद्दल मुख्यमंत्र्यांना सविस्तर माहिती दिली.

मुख्यमंत्र्यांनी महाराष्ट्र चेंबरच्या कार्याची प्रशंसा करत राज्यातील उद्योग, व्यापार व सेवा क्षेत्राच्या विकासासाठी शासन कटिबद्ध असल्याचे सांगितले. तसेच, या क्षेत्राशी संबंधित विविध महत्त्वाच्या विषयांवर आणि धोरणात्मक निर्णयांवर चर्चा करण्यासाठी लवकरच बैठक आयोजित केली जाईल, असे आश्वासन दिले. ही बैठक स्वतः मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली होणार असून, महाराष्ट्र चेंबरचे पदाधिकारी आणि संबंधित विभागांचे वरिष्ठ अधिकारी सहभागी होतील.

मुख्यमंत्र्यांनी या बैठकीतून राज्यातील गुंतवणूक वाढ, रोजगार निर्मिती, पायाभूत सुविधा सुधारणा आणि व्यापार सुलभता यांसाठी ठोस पावले उचलण्याचा निर्धार व्यक्त केला. या उपक्रमामुळे उद्योग क्षेत्रातील गती वाढेल आणि राज्यातील आर्थिक विकासाला चालना मिळेल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

# भारतीय वस्त्रोद्योग निर्यातीवर संकटाचे सावट...

भारतीय वस्त्रोद्योग सध्या मोठ्या आर्थिक आव्हानासमोर उभा आहे. अमेरिकेने अलीकडेच भारतीय वस्तूंवर अतिरिक्त शुल्क लावल्याने निर्यातीतील घट वेगाने वाढू लागली आहे. ही परिस्थिती कायम राहिल्यास वस्त्रोद्योगाला १० अब्ज डॉलर्सपर्यंत तोटा होऊ शकतो.



अमेरिकेची शुल्कवाढ आणि परिणाम: अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतीय वस्तूंवर २५% अतिरिक्त शुल्क लावण्याची घोषणा केली. याआधीच लागू असलेल्या शुल्कासह हा दर ७५% पर्यंत पोहोचला आहे. या उच्च शुल्कामुळे अमेरिकेतील खरेदीदार कंपन्या भारताऐवजी इतर आशियाई देशांकडे वळत आहेत. परिणामी भारतीय कपडा कंपन्यांच्या शेअर्समध्ये मोठी घसरण झाली असून उद्योग क्षेत्रात चिंता वाढली आहे.

**इतर देशांशी तुलना:** भारतावरील शुल्क इतर प्रमुख वस्त्र निर्यातदार देशांपेक्षा जास्त आहे. उदाहरणार्थ व्हिएतनामवर २०%, बांगलादेशवर ९% आणि श्रीलंकेवर ९% शुल्क आहे. या तुलनेत भारतावरील ७५% शुल्कामुळे जागतिक बाजारपेठेत भारताची स्पर्धा कमी होत आहे. खरेदीदार कंपन्यांसाठी स्वस्त आणि कमी शुल्क असलेले देश अधिक आकर्षक ठरत आहेत.

**वस्त्रोद्योगातील भारताची भूमिका:** वस्त्रोद्योग हा भारताच्या प्रमुख निर्यात क्षेत्रांपैकी एक आहे. गेल्या काही वर्षांत या क्षेत्राने देशाच्या निर्यातीमध्ये महत्त्वपूर्ण हिस्सा मिळवला होता. अमेरिकेतील मोठ्या मागणीमुळे भारताने जागतिक बाजारात चांगली हिस्सेदारी निर्माण केली होती. मात्र, उच्च शुल्क, वाढते म जुरीचे दर आणि बदलणाऱ्या व्यापार धोरणांमुळे भारताची स्थिती कमकुवत होत आहे.

**चीन आणि 'चीन + ९' धोरण :** चीन अजूनही आशियातील सर्वात मोठा वस्त्र निर्यातदार देश आहे. चीन + ९ या धोरणांतर्गत अनेक देश चीनवरील अवलंबित्व कमी करण्याचा प्रयत्न करत आहेत. या धोरणाचा भारताला फायदा होऊ शकला असता, पण उच्च शुल्कामुळे भारताचा लाभ कमी झाला आहे. परिणामी, इतर आशियाई देशांना या परिस्थितीतून अधिक फायदा होत आहे.

- **संभाव्य परिणाम :**

✻ निर्यातीत १० अब्ज डॉलर्सपर्यंत घट होण्याची शक्यता.
✻ लाखो लोकांच्या उपजीविकेवर गदा येऊ शकते.
✻ परदेशी खरेदीदार इतर देशांत गुंतवणूक करण्याची शक्यता.

दरम्यान, भारतीय वस्त्रोद्योगाला या संकटातून बाहेर काढण्यासाठी तातडीने धोरणात्मक उपायांची गरज आहे. सरकारने प्रमुख व्यापार भागीदारांसोबत शुल्क कमी करण्यासाठी चर्चेचा मार्ग स्वीकारावा. तसेच, निर्यातीसाठी नवी बाजारपेठा शोधणे, उत्पादन खर्च कमी करणे आणि गुणवत्तेत सुधारणा करणे गरजेचे आहे.

जागतिक बाजारपेठेत स्पर्धा तीव्र होत असताना भारताने वेळ न दवडता योग्य पावले उचलली नाहीत, तर वस्त्रोद्योगाची घसरण थांबवणे कठीण होईल. हे केवळ आर्थिक नुकसान नाही, तर रोजगार, गुंतवणूक आणि देशाच्या निर्यात प्रतिष्ठेशी संबंधित मोठे आव्हान आहे.

## ट्रम्प यांचा निर्णय असंविधानिक

### अमेरिकन अर्थतज्ज्ञ जेफ्री सॅक्स यांची टीका

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतावर ५० टक्के टॅरिफ लादल्यानंतर जागतिक स्तरावर या निर्णयावर तीव्र प्रतिक्रिया उमटल्या आहेत. विशेषतः प्रसिद्ध अमेरिकन अर्थतज्ज्ञ जेफ्री सॅक्स यांनी या निर्णयाला थेट 'असंविधानिक' असे संबोधत ट्रम्प प्रशासनावर जोरदार टीका केली आहे. त्यांनी स्पष्ट केले की, असा निर्णय अमेरिकेच्या राज्यघटनेच्या तत्वांना धरून नसून, तो मुक्त व्यापाराच्या आंतरराष्ट्रीय नियमांनाही बाधक आहे.

सॅक्स यांनी भारताला एक स्वतंत्र महासत्ता म्हणून गौरवले. त्यांच्या मते, भारताने आंतरराष्ट्रीय राजकारणात स्वतःचे स्वायत्त स्थान राखले पाहिजे. त्यांनी अमेरिकेच्या चीनविरोधी धोरणाचा भारतावर परिणाम होऊ नये, असा इशारा दिला. भारताने चीनविरोधी अमेरिकी भूमिकेला केवळ आपल्या फायद्यासाठी वापरू नये, तर जागतिक संतुलन साधण्यासाठी स्वतंत्र धोरण राबवावे, असा सल्लाही त्यांनी दिला आहे.

ऊर्जा सुरक्षेच्या बाबतीत भारताचे हित अबाधित ठेवणे गरजेचे असल्याचे सॅक्स यांनी स्पष्ट केले. भारताने आपली ऊर्जा गरज भागवण्यासाठी १५० कोटी जनतेसाठी तेलसुरक्षा सुनिश्चित करण्यावर भर द्यावा, असेही त्यांनी नमूद केले. त्याचबरोबर, ऊर्जा उत्पादनात विविधता आणणे, पायाभूत सुविधा वाढवणे आणि अक्षय उर्जेच्या प्रकल्पांना चालना देणे, ही भारताची धोरणात्मक गरज असल्याचेही त्यांनी अधोरेखित केले.

# अमेरिकन टॅरिफला तोंड देण्यासाठी केंद्राची २० हजार कोटींची विशेष योजना

## निर्यातदारांना दिलासा : जागतिक स्पर्धेत भारतीय वस्तूंना बळकट करण्यासाठी 'एचएमईएस'मिशन

**अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतावर लावलेल्या वाढीव आयात शुल्काचा परिणाम कमी करण्यासाठी आणि निर्यातदारांना दिलासा देण्यासाठी भारत सरकारने मोठी आर्थिक मदत जाहीर करण्याची तयारी सुरू केली आहे. 'एचएमईएस' (हाय-मार्जिन एक्सपोर्ट सपोर्ट) नावाच्या प्रभावी मोहिमेअंतर्गत सुमारे २० हजार कोटी रुपयांचा विशेष निधी तयार केला जाणार असून, यामध्ये निर्यातदारांच्या खर्चाचा बोजा कमी करण्यावर भर दिला जाईल.**

**सरकारचे उद्दिष्ट :** भारतीय निर्यातदारांना अमेरिकेसह जागतिक बाजारपेठेत स्पर्धात्मकता टिकवून ठेवणे, तसेच वाढत्या टॅरिफच्या अडचणींवर मात करणे. वाणिज्य मंत्रालय, सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग मंत्रालय तसेच वित्त मंत्रालय यांच्यात या योजनेच्या अंतिम आराखड्याबाबत चर्चा सुरू असून सप्टेंबर महिन्यात याची अंमलबजावणी होण्याची शक्यता आहे.

**अमेरिकन टॅरिफचा फटका :** अमेरिकेने अलीकडेच भारतीय वस्तूंवर मोठ्या प्रमाणात आयात शुल्क लादले आहे. त्यामुळे अमेरिकन बाजारपेठेत भारतीय वस्तूंची किंमत वाढली असून स्पर्धक देशांच्या तुलनेत भारतीय उत्पादने महाग पडत आहेत. विशेषतः लघु व मध्यम उद्योग क्षेत्रातील निर्यातदारांना याचा मोठा फटका बसला आहे.

निर्यातीत घट होऊन जागतिक स्तरावर भारतीय ब्रँडची ओळख कमी होऊ नये यासाठी केंद्र सरकार 'एचएमईएस' मिशनच्या माध्यमातून थेट आर्थिक मदत आणि धोरणात्मक सहाय्य देण्याच्या तयारीत आहे.

**निर्यातदारांसाठी दीर्घकालीन फायदे :** ही योजना केवळ तात्पुरती दिलासा देणारी नाही, तर दीर्घकालीन फायद्याची ठरणार आहे. भारतीय निर्यातदारांना केवळ अमेरिकन बाजारपेठेवर अवलंबून राहावे लागणार नाही, तर आफ्रिका, युरोप, आग्नेय आशिया अशा उदयोन्मुख बाजारपेठांतही विस्तार करता येईल.

याशिवाय 'मेक इन इंडिया'उपक्रमाला चालना मिळेल आणि देशातील उत्पादनक्षमता वाढेल. सरकारच्या अपेक्षेनुसार या योजनेमुळे पुढील पाच वर्षांत भारतीय निर्यातीत लक्षणीय वाढ होऊ शकेल.

**'एचएमईएस'मिशनचे उद्दिष्ट** : या मोहिमेचा मुख्य उद्देश भारतीय वस्तूंना आंतरराष्ट्रीय बाजारात स्थिर स्थान मिळवून देणे आहे. यासाठी 'हाय मार्जिन' असलेल्या आणि परकीय बाजारात मागणी असलेल्या वस्तूंना प्राधान्य दिले जाणार आहे. वाणिज्य मंत्रालयाच्या मते, अमेरिकन टॅरिफमुळे निर्माण झालेला धक्का केवळ निर्यातीत घट घडवणार नाही, तर उत्पादन क्षेत्रातील रोजगारांवरही परिणाम करू शकतो. त्यामुळे या योजनेतून रोजगार संरक्षणालाही महत्त्व दिले जाईल.

दरम्यान, ही योजना सप्टेंबरमध्ये लागू करण्याचा सरकारचा मानस आहे. त्यासाठी सर्व मंत्रालये एकत्रितपणे काम करत आहेत. 'एचएमईएस' मिशनमुळे भारतीय निर्यातदारांना केवळ अमेरिकन टॅरिफच्या परिणामांपासून बचाव होणार नाही, तर नव्या बाजारपेठांच्या संधीही खुल्या होतील.

### योजनेची वैशिष्ट्ये

- **कमी व्याजदरातील कर्ज :** निर्यातदारांना सहज व स्वस्त कर्ज मिळावे यासाठी बँकांना विशेष निधी उपलब्ध करून दिला जाणार आहे.
- **उत्पादन व निर्यात खर्चात कपात:** टॅरिफच्या वाढत्या भारातून सुटका करण्यासाठी सरकार थेट अनुदान देणार आहे.
- **ब्रँड प्रमोशन:** भारतीय उत्पादने जागतिक पातळीवर अधिक स्पर्धात्मक व्हावीत यासाठी 'मेड इन इंडिया' ब्रँड प्रमोशन मोहिमा राबवल्या जातील.
- **ऑनलाइन व्यवहार सुलभता:** निर्यातदारांना ऑनलाइन व्यवहार, पेमेंट आणि डॉक्युमेंटेशन प्रक्रियेत सुलभता आणली जाईल.
- अमेरिकेव्यतिरिक्त इतर देशांत भारतीय वस्तूंसाठी नवीन बाजारपेठा निर्माण करण्यावर भर दिला जाईल.

# जागतिक टॅरिफ; महाराष्ट्रातील उद्योग-कृषी क्षेत्रातील सध्याचे चित्र

## संरक्षणवादाची झळ, स्थानिक धोरणांची चाल, आणि शेतकरी-व्यापाऱ्यांचा नवा संघर्ष

**गेल्या काही दिवसांत (२५ जुलै ते ९ ऑगस्ट २०२५) जग, भारत आणि महाराष्ट्र या तिन्ही पातळ्यांवर उद्योग, व्यापार आणि कृषी क्षेत्रात महत्त्वपूर्ण घडामोडी घडल्या. एका बाजूला जागतिक पातळीवर वाढत्या संरक्षण वादामुळे व्यापारातील अनिश्चितता वाढली, तर दुसरीकडे राज्य सरकारने महसूल व स्थानिक उद्योग वृद्धीच्या दिशेने काही महत्त्वाची धोरणात्मक पावले उचलली.**

**● जागतिक घडामोडी : संरक्षणवादाचा उग्र चेहरा**

६ ऑगस्ट रोजी अमेरिकेने काही परदेशी वस्तूंवर २५% अतिरिक्त टॅरिफ लावण्याची घोषणा केली. यामुळे काही वस्तूंवरील एकूण शुल्क ५०% पर्यंत गेले. जागतिक स्तरावर हा निर्णय एक सशक्त संदेश मानला जात आहे.

**जागतिक निर्यातदार, विशेषतः** कापड, कृषी–प्रक्रिया व हलक्या उत्पादन क्षेत्रातील पुरवठादार, यांच्या खर्चात वाढ. आंतरराष्ट्रीय मागणीतील अस्थिरता वाढल्याने जागतिक व्यापार संघटना (WTO) आणि वर्ल्ड इकॉनॉमिक फोरम (WEF) यांनीही या प्रवृत्तीबाबत इशारे दिले.

**● राष्ट्रीय चित्र : भारताची टॅरिफ धक्का सहन करण्याची धडपड**

भारतातील काही प्रमुख निर्यातक्षेत्रांवर अमेरिकन टॅरिफचा थेट परिणाम दिसू लागला आहे. वस्त्रोद्योग, कापडासाठी लागणारा कच्चा माल, तसेच प्रक्रिया केलेल्या कृषी उत्पादनांच्या निर्यातीत दबाव वाढला आहे.

भारत सरकारने व्यापार संघटनांबरोबर आपत्कालीन बैठक घेतली. या बैठकीत नुकसान कमी करण्यासाठी धोरणात्मक पावले उचलणे. संभाव्य उपायांमध्ये निर्यात प्रोत्साहन पॅकेज, टॅरिफ उपशमासाठी राजनैतिक चर्चा, आणि स्थानिक बाजारातील मागणी वाढवण्याच्या योजना यावर चर्चा करण्यात आली.

**● महाराष्ट्र : उद्योग आणि कृषीतील दोन्ही बाजूंवर परिणाम**

**निर्यातीवरील तत्काळ दबाव**

दक्षिण महाराष्ट्रातील कोल्हापूर, सांगली आणि सोलापूर या पट्ट्यात वाहनांचे सुटे भाग, हळद, बेदाणे आणि कापड यांच्या निर्यातीवर परिणाम दिसून येईल. स्थानिक व्यापार संघटनांच्या अंदाजानुसार, या प्रदेशात कोट्यवधी रुपयांचे व्यवहार थांबण्याची किंवा कमी होण्याची शक्यता आहे. निर्यात कमी झाल्यास स्थानिक उत्पादन घटणे, मजुरांना कमी काम मिळणे आणि शेवटी ग्रामीण अर्थव्यवस्थेत मंदी येण्याचा धोका आहे.

**● राज्य सरकारचे महसूल आणि उद्योग वृद्धीचे पाऊल**

राज्य सरकारने गेल्या पंधरवड्यात एक महत्त्वाचा निर्णय घेतला. धान्यावर आधारित "Maharashtra Made Liquor (MML)' या नवीन श्रेणीला परवानगी. या निर्णयामुळे अंदाजे ₹ ३,००० कोटी अतिरिक्त महसूल अपेक्षित आहे. यामागचा हेतू दुहेरी आहे. एकीकडे स्थानिक धान्य वापरून ग्रामीण उद्योगांना चालना देणे, आणि दुसरीकडे राज्याचा महसूल वाढवणे आहे.

**● 'कृषी समृद्धी' योजनेचा शुभारंभ**

शेतकऱ्यांसाठी राज्य सरकारने ₹२५,००० कोटींची पाच वर्षांची 'कृषी समृद्धी' योजना जाहीर केली. यामध्ये पायाभूत सुविधा, सिंचन व्यवस्था, पंपिंग तंत्रज्ञान, बाजारपेठ कनेक्टिव्हिटी आणि उत्पादनक्षमतेसाठी मदत या बाबींना प्राधान्य आहे. लहान व मध्यम शेतकऱ्यांसाठी ही योजना दीर्घकालीन उत्पन्न स्थिरता देऊ शकते. मात्र, तिच्या अंमलबजावणीचा वेग आणि पारदर्शकता हा यशाचा मुख्य घटक असेल.

**● कृषी निर्यातीतील संधी व अडथळे**

PED व इतर संस्थांनी अलीकडेच आंतरराष्ट्रीय पातळीवर भारतीय आंब्यांचे प्रदर्शन आयोजित केले. यात महाराष्ट्रातील आंबा उत्पादकांनी सक्रिय सहभाग घेतला. अशा प्रदर्शनांमुळे नवीन निर्यात बाजारपेठा खुल्या होऊ शकतात. तथापि, अमेरिकेसारख्या मोठ्या बाजारपेठेत टॅरिफ वाढल्याने दीर्घकालीन निर्यात नियोजनावर परिणाम होऊ शकतो. त्यामुळे निर्यातदारांना पर्यायी बाजारपेठा शोधाव्या लागतील. मध्यपूर्व, आग्नेय आशिया किंवा आफ्रिका हे संभाव्य पर्याय आहेत.

**● पुढील काळातील संभाव्य दिशा**

**१. निर्यातीत विविधीकरण:** अमेरिकन टॅरिफच्या पार्श्वभूमीवर भारतीय आणि महाराष्ट्रातील निर्यातदारांना नवीन बाजारपेठा आणि उत्पादन श्रेणी शोधण्याची आवश्यकता आहे.

**२. स्थानिक मागणी वाढवणे:** राज्य सरकारचे MML सारखे निर्णय किंवा कृषी पायाभूत योजना स्थानिक मागणी आणि उत्पादन वाढवू शकतात, पण त्यांचा सामाजिक स्वीकार महत्त्वाचा आहे.

**३. पुरवठा साखळीचे पुनर्गठन:** जागतिक संरक्षणवादामुळे कंपन्यांना सप्लाय चेन अधिक स्थानिक किंवा प्रादेशिक बनवावी लागेल.

**४. कृषी उत्पादन स्थिरता:** 'कृषी समृद्धी'सारख्या योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीमुळे हवामान आणि बाजारपेठीय धक्क्यांना तोंड देता येईल.

**५. राजकीय पातळीवरील प्रयत्न:** भारताने अमेरिकेसोबत व्यापार चर्चेला पुनरारंभ करणे हे निर्यात बचावासाठी महत्त्वाचे पाऊल ठरेल.

# 'भारतीय आहोत, भारतीयच वापरू'

## महाराष्ट्र चेंबर्सच्या अभियानाला सुरुवात

### 'आत्मनिर्भर भारत' घडवण्यासाठी चेंबरचा पुढाकार; अमेरिकेच्या ५०% कराला सडेतोड उत्तर




◆ **मुंबई : महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, ने सुरू केलेल्या भारतीय आहोत, भारतीयच वापरू अभियानाच्या बोध चिन्हाचे अनावरण करताना चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी**

**मुंबई :** भारताला आर्थिकदृष्ट्या अधिक सक्षम आणि 'आत्मनिर्भर' बनवण्यासाठी महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री अँड अग्रिकल्चर संस्थेने एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. ९ ऑगस्ट क्रांती दिनाचे औचित्य साधून त्यांनी 'भारतीय आहोत, भारतीयच वापरू' या नावाने एक राज्यव्यापी जनजागृती अभियानाची सुरुवात केली आहे. या अभियानाचा मुख्य उद्देश नागरिकांना स्वदेशी वस्तूंचा वापर करण्यासाठी प्रोत्साहित करणे हा आहे.

या अभियानाच्या उद्घाटनप्रसंगी बोलताना महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी यांनी अमेरिकेने भारतावर लादलेल्या ५०% कराच्या मनमानी निर्णयावर तीव्र नाराजी व्यक्त केली. ते म्हणाले, अमेरिकेच्या या अन्यायकारक धोरणांना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सडेतोड उत्तर दिले आहे. अशा कठीण परिस्थितीत आम्ही महाराष्ट्र चेंबर म्हणून पंतप्रधानांच्या पाठीशी ठामपणे उभे आहोत. त्यांच्या 'आत्मनिर्भर भारत' या संकल्पनेला बळ देण्यासाठीच आम्ही हे अभियान सुरू केले आहे.

गांधी यांनी पुढे सांगितले की, अमेरिका असो किंवा चीन, यांसारख्या देशांच्या मनमानी कारभाराला योग्य प्रत्युत्तर देण्यासाठी आता भारतीयांनीच पुढाकार घेणे आवश्यक आहे. देशाची अर्थव्यवस्था मजबूत करण्यासाठी आणि परदेशी वस्तूंवरील अवलंबित्व कमी करण्यासाठी प्रत्येक नागरिकाने आपल्या देशात तयार होणाऱ्या वस्तूंना प्राधान्य द्यायला हवे. याच विचारातून आम्ही हे जनजागृती अभियान सुरु केले आहे. या अभियानाच्या माध्यमातून राज्याच्या प्रत्येक कानाकोपऱ्यात जाऊन लोकांना स्वदेशी वस्तूंचे महत्त्व पटवून दिले जाईल. येत्या सणासुदीमध्ये किमान ५ हजार कोटींचा विदेशी वस्तू व्यापार कमी होवून भारतीय वस्तूंची विक्री वाढेल.

या प्रसंगी व्यापारी आणि उद्योजक उपस्थित होते. या अभियानामुळे येत्या वर्ष भरात महाराष्ट्रातून किमान ७० हजार कोटींच्या भारतीय वस्तूंचा वापर वाढविण्याचे उद्दिष्ट पूर्ण केल्यास देशाच्या आर्थिक विकासाला निश्चितच गती मिळेल, असा विश्वासही गांधी यांनी यावेळी व्यक्त केला.

## धुळ्यात मासिआ बिझनेस नेटवर्किंग फोरमची लवकरच सुरुवात

**नाशिक :** महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री अँण्ड ॲग्रिकल्चरचे अध्यक्ष ललित गांधी यांच्या संकल्पनेतून २३ मार्च २०२४ रोजी नाशिक येथे मासिआ बिझनेस नेटवर्किंग फोरमची सुरुवात झाली. नाशिकमधील यशस्वी प्रतिसादानंतर मुंबई, पुणे, संभाजीनगर येथेही हा उपक्रम राबविण्यात आला.

धुळ्यातील चेंबरचे सभासद व व्यापारी–औद्योगिक संघटनांच्या प्रतिनिधींची ६ ऑगस्ट २०२५ रोजी झालेल्या बैठकीत लवकरच फोरम सुरु करण्याचा निर्णय झाला. को–चेअरमन दत्ता भालेराव यांनी फोरमच्या फायद्यांची माहिती देत नाशिकमधील अनुभव सांगितले. त्यांनी धुळ्यातील व्यापारी–उद्योजकांना सहभागी होण्याचे आवाहन केले.

बैठकीस माजी उपाध्यक्ष नितिन बंग, उदय ठाकरे (किर्लोस्कर कंपनी), चंद्रकांत सोनार उपस्थित होते. नितिन बंग यांनी चेंबरचे कार्य, विविध उपक्रम आणि फोरममुळे धुळ्यातील व्यापारी–उद्योजकांना राज्यभरातील बाजारपेठ उपलब्ध होणार असल्याचे सांगितले. उदय ठाकरे यांनी नेटवर्क बिजनेसवरील सखोल माहिती दिली. यावेळी राजेश गिंदोड़िया, अजय नासिककर, प्रशांत देवरे, अभिजीत सूर्यवंशी, मंदार महाजन, सुरेश कुंदनानी, तनु दुसेजा, विशाल राठोड़, दीपक भावसार, किशोर डीयालानी, सतीश भावसार, राहुल कुलकर्णी, सुरेश दंडवानी, सुशील कालड़ा यांच्यासह १२५ व्यापारी–उद्योजक उपस्थित होते.

महासत्ता एकच आवृत्ती

## महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स भारत सरकारच्या पाठीशी : ललित गांधी

कोल्हापूर ता.८ (प्रतिनिधी)–

**अमेरिकेचे टॅरिफ वॉर तीव्र होत असताना भारताने घेतलेली कणखर भूमिका सर्वार्थाने भारताच्या हिताची आणि योग्य आहे, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या भूमिकेला महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्टी अँन्ड अॅग्रीकल्चरचा पाठींबा महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्टी अँन्ड अॅग्रीकल्चरचे अध्यक्ष ललित गांधी यांनी पत्रकार परिषदेत जाहीर केला. यावेळी उद्योजक रमाकांत मालू उपस्थित होते.**



गांधी म्हणाले की, अमेरिकेने भारतीय वस्तूंवर ५० टक्के शुल्क लादणे अत्यंत चिंताजनक आहे. भारताने आपल्या ऊर्जा गरजा रशियाकडून भागवण्याचा जो सार्वभौम निर्णय घेतला, त्याबद्दल भारताला लक्ष्य करणे चुकीचे आहे आणि यामुळे धोरणात्मक भागीदारीच्या भावनेला धक्का बसतो. टॅरिफच्या माध्यमातून अमेरिका दबावतंत्राचा वापर करीत असून अमेरिकेच्या या दबावाला बळी न पडता केंद्राने घेतलेल्या भूमिकेचे स्वागत करतो,व महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स मोदी यांच्या भूमिकेला साथ देणार आहे.अमेरिकेच्या या भूमिकेमुळ भारतातील ऑटोमोबाईल, टेक्सटाईल्स, ज्वेलरी, कृषी तसेच उद्योग क्षेत्राला त्रास सहन करावा लागणार आहे.अमेरिका टॅरिफच्या आडून शुल्क युध्द खेळत आहे. महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्टी अँन्ड ऑग्रीकल्चरतर्फे क्रातीदिनापासून महाराष्ट्रभर भारतीय आहोत-भारतीय वापरु ही भूमिका घेवून नवे अभियान सुरु करीत आहे.अमेरिकेच्या या शुल्क युध्दामुळे पश्चिम महाराष्ट्रालाही फटका बसणार असून ऑटोपार्ट, औषधनिर्माण क्षेत्रासह इंजिनिअरींग, इलेक्ट्रॉनिक्स, इलेक्टीकल, कृषी, वस्त्रोद्योग, ज्वेलरी तसेच अन्य कृषिउत्पादनाच्या निर्यातीवर बंधणे येणार असल्याने पर्यायी बाजारपेठ निर्माण करण्यास पर्याय नसल्याचेही गांधी म्हणाले. अमेरिकेत भारतीय उत्पादने महाग झाल्यामुळे तेथील मागणी कमी होईल. याचा थेट परिणाम महाराष्ट्रातील निर्यातदारांवर होईल, यामुळे विशेषत: जे निर्यातदार केवळ अमेरिकन बाजारपेठेवर अवलंबून आहेत, त्यांना मोठा फटका बसेल. तसेच आयात वाढीचा धोकाही संभवतो. या पार्श्वभूमीवर भारत सरकारच्या भूमिकेला महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्टी अँन्ड ऑग्रीकल्चरचा पाठींबा राहील, असा पुनर्रुच्चारही त्यांनी केला.

---

महासत्ता एकच आवृत्ती

## कोल्हापुरी चप्पल जागतिक स्तरावर विस्ताराची शक्यता

### प्राडा शिष्टमंडळाची कोल्हापूरला भेट



कोल्हापूर,ता.१५(प्रतिनिधी)–

**जगप्रसिद्ध प्राडा कंपनी आणि कोल्हापुरी चप्पल यांच्यातील चर्चित वादानंतर मंगळवारी प्राडा कंपनीचे अधिकृत शिष्टमंडळ कोल्हापुरात दाखल झाले. चपलांच्या बनावटीचा प्रत्यक्ष अनुभव घेण्यासाठी हे शिष्टमंडळ कोल्हापुरी चप्पल बनवणाऱ्या विविध भागांना भेट देत आहे. कारागिरांची कामाची पद्धत, तांत्रिक बारकावे आणि त्यांच्यासमोरील अडचणी यांचा अभ्यास करत त्यांनी कोल्हापुरी चपलांविषयी सखोल चर्चा केली.**

या भेटीत शिष्टमंडळातील तांत्रिक आणि उत्पादन विभागातील वरिष्ठ अधिकारी, पाओलो टिवरॉन, पॅट्रीमेकिंग मॅनेजर डॅनियल कॉंटू, तसेच कंपनीचे सल्लागार आंद्रिया पोलास्ट्रेली,रॉबोर्टो पोलास्ट्रेली आणि व्यावसायिक सहभागी झाले होते. यावेळी महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्रीज अँड अॅग्रिकल्चरचे अध्यक्ष ललित गांधी, कोल्हापुरी चप्पल व्यावसायिक आणि अनेक नामवंत कारागीरही उपस्थित होते.

प्राडा शिष्टमंडळाने विविध प्रकारच्या चपला प्रत्यक्ष हातात घेतल्या, त्यांची बनावट समजून घेतली आणि त्या घालून पाहिल्या. त्यांनी या चपलांमागील कौशल्य, डिझाईन आणि हस्तकलेचे मनापासून कौतुक केले. स्थानिक व्यावसायिकांनी या शिष्टमंडळाचे कोल्हापुरी पद्धतीने स्वागत करत त्यांना खास कोल्हापुरी चप्पल भेट दिली.

या भेटीदरम्यान कोल्हापुरी चप्पल उद्योग आणि प्राडा यांच्यात सकारात्मक चर्चा झाल्याचे संकेत मिळाले असून, भविष्यात या उद्योगाला जागतिक बाजारपेठेत प्रवेश मिळण्याची शक्यता असल्याचे दिसते. यासंदर्भात ललित गांधी म्हणाले, प्राडासारख्या ब्रँडसोबत समन्वय साधल्यास कोल्हापुरी चप्पल उद्योगाला जागतिक व्यासपीठावर नवी दिशा मिळेल. येथील कारागिरांच्या कौशल्याला मान्यता मिळून आर्थिक विकासालाही चालना मिळेल.

या ऐतिहासिक भेटीमुळे कोल्हापुरी चप्पल उद्योगासाठी एक सकारात्मक पाऊल उचलले गेल्याचे मानले जात आहे.

MAHASATTA EPAPER
K...pur, Sangli, Satara, Belgaum Edition.
...2025 Page No - Mahasatta_11

---

## महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सचा स्वदेशीचा नारा

### आत्मनिर्भर भारतासाठी राज्यव्यापी मोहीम; क्रांती दिनी केली घोषणा

**कोल्हापूर :** अमेरिकेने भारतावर लादलेल्या ५० टक्के आयात शुल्काला प्रत्युत्तर म्हणून आणि मआत्मनिर्भर भारतफ संकल्पनेला बळ देण्यासाठी, महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री अँड अॅग्रिकल्चरने क्रांती दिनाचे औचित्य साधून मभारतीय आहोत, भारतीयच वापरूफ या राज्यव्यापी जनजागृती अभियानाची घोषणा केली आहे. या अभियानाचा मुख्य उद्देश नागरिकांना स्वदेशी वस्तूंच्या वापरासाठी प्रोत्साहित करणे हा आहे.



**अभियानाच्या बोधचिन्हाचे अनावरण करताना ललित गांधी.**

चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी म्हणाले, अमेरिकेच्या अन्यायकारक धोरणांना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिलेल्या सडेतोड उत्तराला आमचा पूर्ण पाठिंबा आहे. आता अमेरिका किंवा चीनसारख्या देशांच्या मनमानीला उत्तर देण्यासाठी भारतीयांनीच पुढाकार घेऊन स्वदेशी वस्तूंचा वापर वाढवला पाहिजे. सणासुदीच्या काळात विदेशी वस्तूंच्या व्यापारात किमान ५ हजार कोटींची घट करून भारतीय वस्तूंची विक्री वाढवण्याचे उद्दिष्ट आहे. वर्षभरात महाराष्ट्रात सुमारे ७० हजार कोटी रुपयांच्या भारतीय वस्तूंचा वापर वाढवून देशाच्या अर्थव्यवस्थेला गती देण्याचे ध्येय आहे. सर्व व्यापारी, उद्योजक आणि नागरिकांना यामध्ये सहभागी व्हावे.

---

लोकमत

## 'भारतीय आहोत, भारतीयच वस्तू वापरू' महाराष्ट्र चेंबरचे अभियान

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** भारताला आर्थिकदृष्ट्या अधिक सक्षम आणि 'आत्मनिर्भर' बनवण्यासाठी महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री अँड अॅग्रिकल्चरने शनिवारी क्रांतिदिनाचे औचित्य साधून "भारतीय आहोत, भारतीयच वस्तू वापरू' अशी हाक देत स्वदेशी वस्तूंचा वापर करण्याचे आवाहन केले.

या अभियानाची शनिवारपासून सुरुवात करण्यात आली. महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी यांनी अमेरिकेने भारतावर लादलेल्या ५० टक्के कराच्या मनमानी निर्णयावर तीव्र नाराजी व्यक्त केली. ते म्हणाले, 'आत्मनिर्भर भारत' या संकल्पनेला बळ देण्यासाठीच आम्ही हे अभियान सुरू केले आहे.' अमेरिका असो किंवा चीन, यांसारख्या देशांच्या मनमानी कारभाराला योग्य प्रत्युत्तर देण्यासाठी आता भारतीयांनीच पुढाकार घेणे आवश्यक आहे. देशाची अर्थव्यवस्था



**महाराष्ट्र चेंबरच्या 'भारतीय आहोत, भारतीयच वापरू' अभियानाच्या बोधचिन्हाचे अनावरण अध्यक्ष ललित गांधी यांच्या हस्ते करण्यात आले.**

मजबूत करण्यासाठी आणि परदेशी वस्तूंवरील अवलंबित्व कमी करण्यासाठी प्रत्येक नागरिकाने आपल्या देशात तयार होणाऱ्या वस्तूंना प्राधान्य द्यायला हवे. येत्या सणासुदीमध्ये किमान ५ हजार कोटींचा विदेशी वस्तू व्यापार कमी होऊन भारतीय वस्तूंची विक्री वाढेल. (वा.प्र.)

---

पुढारी

## वीजदर कमी करण्यास सरकारला भाग पाडू

### राज्य वीज परिषदेत निर्धार; 'वन नेशन, वन पॉवर' धोरण लागू करा



परिषदेतील ठराव...

---

लोकमत

## जीएसटी सुधारणा निर्णयामुळे राज्याच्या अर्थव्यवस्थेला चालना

### ललित गांधी यांना विश्वास

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** जीएसटी कायद्यात सुधारणा करण्याच्या निर्णयामुळे महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेला अधिक चालना मिळेल, असा विश्वास महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्रीज अॅण्ड अॅग्रिकल्चरचे अध्यक्ष ललित गांधी यांनी व्यक्त केला. ग्राहक, व्यापारी आणि उद्योगांसाठी दिलासा देणारे पाऊल असल्याचे गांधी म्हणाले.

केंद्र सरकारने नुकतीच जीएसटी करप्रणाली चार टप्प्यांऐवजी दोन टप्प्यात करण्याचा निर्णय घेतला.

ललित गांधी म्हणाले की, जीएसटी कररचना ५ टक्के आणि १८ टक्के अशा दोन मुख्य दरांमध्ये साधी-सोपी करणे तसेच जीवनावश्यक वस्तू व औषधे करमुक्त करणे हे महाराष्ट्रातील कोट्यवधी ग्राहकांसाठी मोठा दिलासा आहे. व्यापारी व किरकोळ व्यावसायिक विशेषत: छोट्या व्यापाऱ्यांना या निर्णयामुळे कर भरण्यास आणि कर परतावा मिळवण्यास सोपे जाईल.

चार टप्प्यातील कर प्रणालीमुळे कर विभाग आणि करदाते यांच्यात होणारे वाद कमी होऊन बाजारपेठेतील व्यवहारात वाढ होईल. महाराष्ट्रातील ऑटोमोबाइल, वस्त्र, फार्मा व एफएमसीजी अशा विविध क्षेत्रांमध्ये मागणी व पुरवठाही वाढेल आणि उत्पादन खर्चही कमी होईल. या सुधारणेमुळे उद्योगांची स्पर्धात्मकता वाढेल, निर्यातदार व एमएसएमई यांना मोठा दिलासा मिळेल. या निर्णयामुळे सणासुदीच्या काळात वस्तू, विविध उत्पादनांना मागणी व ग्राहकांचा आत्मविश्वास वाढेल, असेही ललित गांधी म्हणाले.

Kolhapur Main ... 2025

---

## अमेरिकेचे टॅरिफ वॉर : महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स केंद्र सरकारसोबत ठाम

### पर्यायी बाजारपेठा आणि गुणवत्तावाढीबरोबरच आयात अवलंबित्व कमी करण्यावर भर देणार

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

महाराष्ट्रातून होणारी एकूण निर्यात



अमेरिकेला होणारी महाराष्ट्राची प्रमुख निर्यात

महासत्ता

## महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सच्या 'भारतीय वस्तू वापरू' जनजागृतीला सुरुवात



लोकमत

## उद्योजकांनो, अमेरिकेपुढे झुकू नका, पर्याय शोधा; 'महाराष्ट्र चेंबर' करणार सर्व सहकार्य



भारतीय आहोत, भारतीयच वस्तू वापरणार

कोल्हापुरातून २ हजार कोटींची अनेकित निर्यात

पुढारी

## देशाची प्रगती रोखण्यासाठीच 'टॅरिफ'; व्यापाऱ्यांनी द्यावा स्वदेशीचा नारा

डॉ. प्रतापसिंह जाधव; 'महाराष्ट्र चेंबर'च्या शिष्टमंडळाने घेतली भेट



सुराज्य



## वाढत्या वीज दरामुळे उद्योग, व्यापार, कृषी क्षेत्राचा कणा मोडण्याचा धोका : ललित गांधी

सागर

## सरकारने 'वन नेशन वन पॉवर' धोरण अंमलात आणावे



कोल्हापूर येथे राज्यस्तरीय वीज परिषद

लोकमत

## वीज दरवाढ मागे घेतल्याशिवाय माघार घेणार नाही



पुण्य नगरी

## नवीन बाजारपेठांचा शोध हेच अमेरिकेला चोख उत्तर

ललित गांधी : देशांतर्गत उत्पादनांवर अधिक लक्ष केंद्रित करणे गरजेचे

भारतीय आहोत, भारतीयच वापरू



## जीएसटी सुधारणांचे महाराष्ट्र चेंबरकडून स्वागत

महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेला अधिक चालना मिळेल: ललित गांधी



# सरकारने 'वन नेशन वन पॉवर रेट' धोरण आणावे : ललित गांधी

## कोल्हापूर वीज परिषदेत उद्योग, व्यापार व कृषी क्षेत्राच्या अडचणी मांडल्या



◆ **कोल्हापूर : येथे आयोजित वीज परिषदेचे दीपप्रज्वलन करून उदघाटन करताना महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी. बाजूला कोल्हापूर चेंबरचे अध्यक्ष संजय शेटे, विवेक वेलणकर, शंतनू दीक्षित, जावेद मोमीन, विक्रांत पाटील, अजय भोसरीकर, आशिष पेडणेकर, संजय सोनवणे आदी.**

**कोल्हापूर, दि . १९ :** सरकारने वन नेशन वन पॉवर रेट धोरण तातडीने अंमलात आणणे गरजेचे आहे, अन्यथा वाढत्या वीज दरामुळे उद्योग, व्यापार आणि कृषी क्षेत्राचा कणा मोडण्याचा धोका निर्माण होईल, असा ठाम इशारा महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री अँड ॲग्रिकल्चरचे अध्यक्ष ललित गांधी यांनी दिला.

देवल क्लब, कोल्हापूर येथे आयोजित राज्यस्तरीय वीज परिषदेत ते बोलत होते. ही परिषद महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री अँड ॲग्रिकल्चर व कोल्हापूर चेंबर ऑफ कॉमर्सच्या संयुक्त विद्यमाने घेण्यात आली होती.

परिषदेत प्रास्ताविकपर भाषण करताना ललित गांधी म्हणाले की, वीज हे उद्योग, व्यापार व शेतीचे जीवनमान आहे. मागील काही वर्षांपासून दरवाढ सातत्याने होत आहे. उत्पादन खर्च झपाट्याने वाढल्यामुळे उद्योगांची स्पर्धात्मकता कमी होत असून लघुउद्योगांना तोट्याला सामोरे जावे लागत आहे. शेतकऱ्यांवरही याचा मोठा परिणाम होत असून ही परिस्थिती गंभीर आहे. सरकारने तातडीने उपाययोजना केल्या नाहीत तर स्थिती अधिक बिघडेल.

स्मार्ट वीज मीटरबाबत त्यांनी स्पष्ट केले की, ग्राहकांमध्ये विश्वास निर्माण होणे महत्त्वाचे आहे. या प्रणालीमुळे खर्चाचा बोजा वाढणार नाही, याची खात्री सरकारने द्यावी. ग्राहकांना अडचणीत आणणारे निर्णय नकोत, असेही ते म्हणाले.यावेळी ललित गांधी यांनी महाराष्ट्र चेंबरच्या शंभर वर्षांच्या कार्याचा आढावा घेतला. चेंबरने नेहमीच विधायक भूमिका घेत उद्योग, व्यापार आणि कृषी क्षेत्रासाठी पावले उचलली आहेत. वीज, कर, निर्यात–आयात धोरण, पर्यावरण, कामगार कायदे आदी विषयांवर चेंबरने गेल्या दहा वर्षांत सतत प्रयत्न केले आहेत, असे ते म्हणाले.



◆ **कोल्हापूर : उपस्थित प्रतिनिधींना मार्गदर्शन करताना महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी.**

भविष्यातील दिशा स्पष्ट करताना त्यांनी सांगितले की, राज्यातील उद्योजक आणि शेतकऱ्यांच्या हितासाठी चेंबर ठोस भूमिका घेणार आहे. सरकार आणि महावितरणसोबत चर्चा करून वीज दर नियंत्रण, सुलभ सुविधा व उद्योगांना प्रोत्साहन देणारी पावले उचलली जातील. उद्योग वाढतील, व्यापारी सबळ होतील आणि शेतकरी सुखावेल तरच राज्याचा आर्थिक कणा मजबूत राहील. त्यासाठी वीज क्षेत्रातील सुधारणा अपरिहार्य आहेत.

महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स तर्फे आयोजित परिषदेचे आयोजन कोल्हापूर चेंबर, महाराष्ट्र राज्य इरिगेशन फेडरेशन, दि महाराष्ट्र सोलर मॅन्युफॅक्चर्स असोसिएशन, महाराष्ट्र राज्य वीज ग्राहक संघटना, अखिल भारतीय ग्राहक पंचायत, कोल्हापूर हॉटेल मालक संघ, कॉन्फेडरेशन ऑफ इंडियन इंडस्ट्री –

(पुढील पानावर)

साऊथ महाराष्ट्र झोन, कोल्हापूर इंजिनिअरिंग असोसिएशन, शिरोली मॅन्युफॅक्चर्स असोसिएशन, गोकुळ शिरगाव मॅन्युफॅक्चर्स असोसिएशन, मॅन्युफॅक्चर्स असोसिएशन ऑफ कागल–हातकणंगले, दि इन्स्टिट्यूट ऑफ इंडियन फाउंड्रीमन – कोल्हापूर चॅप्टर आणि श्री लक्ष्मी इंडस्ट्रियल मॅन्युफॅक्चर्स असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले होते.

कोल्हापूर चेंबर ऑफ कॉमर्सचे अध्यक्ष संजय शेटे यांनी स्वागत केले. महाराष्ट्र राज्य इरिगेशन फेडरेशनचे सदस्य विक्रांत पाटील यांनी वीज परिषदेचा हेतू स्पष्ट केला. यावेळी कोल्हापूर चेंबरचे माजी अध्यक्ष प्रदीप कपाडिया, आनंद माने, महाराष्ट्र चेंबर ट्रस्ट बोर्ड चेअरमन आशिष पेडणेकर, उपाध्यक्ष करुणाकर शेट्टी, श्रीकृष्ण परब, संजय सोनवणे, प्रदीप खाडे, राजेंद्र सूर्यवंशी, कमलाकांत कुलकर्णी, स्वरुप कदम, मोहन कुशिरे, राहुल पाटील, महेश दाते आणि सारंग जाधव आदी मान्यवर उपस्थित होते.

महाराष्ट्र चेंबर ऊर्जा समितीचे चेअरमन मुकुंद माळी, उद्योजक सचिन शिरगावकर, महाराष्ट्र वीज ग्राहक संघटनेचे सचिव जावेद मोमीन, महाराष्ट्र सोलर मॅन्युफॅक्चर्स असोसिएशनचे अध्यक्ष अमित कुलकर्णी, वीज ग्राहक तक्रार निवारण मंचचे माजी अध्यक्ष अजय भोसरेकर, सजग नागरिक मंच पुणेचे विवेक वेलणकर, प्रयास संस्था पुणेचे शंतनु दीक्षित आणि शेखर करंदीकर यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सीमा जोशी यांनी केले. मुकुंद माळी यांनी आभार मानले.

### परिषदेतील ठराव...

- शेतीच्या नावाखाली वित्त गळती आणि वीज चोरी थांबवा
- घरगुती ग्राहकांना ३०० युनिटपर्यंत वीज सरसकट माफ करा
- सर्व शेती फिडरवर स्मार्ट मीटर बसवावेत
- शेती पंपांच्या नवीन कनेक्शनसाठी सोलर सक्ती करू नये
- उद्योजक ग्राहकांना प्रत्यक्ष खर्चानुसार बिल द्यावे
- क्रॉस सबसिडी चार्ज आणि वहन आकारात वाढ करू नये
- सर्व भार व्यावसायिक आणि औद्योगिक ग्राहकांवर टाकू नये

# महाराष्ट्र चेंबरची नववी गव्हर्निंग कौन्सिल बैठक उत्साहात




**◆ कोल्हापूर : नवव्या गव्हर्निंग कौन्सिल बैठकीला उपस्थित अध्यक्ष ललित गांधी, उपाध्यक्ष करुणाकर शेट्टी, रमाकांत मालू, दिलीप गुप्ता, संजय सोनावणे, प्रफुल्ल मालानी, श्रीकृष्ण परब, महाराष्ट्र चेंबर बोर्ड ट्रस्ट चेअरमन आशिष पेडणेकर, कोल्हापूर चेंबरचे अध्यक्ष संजय शेटे आणि माजी अध्यक्ष प्रदीप कापडिया आदी.**

**कोल्हापूर, दि. १९ :** येथील जैन बोर्डिंगच्या चतुरबाई सभागृहात महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री अँड ॲग्रिकल्चरच्या नवव्या गव्हर्निंग कौन्सिल बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.

या बैठकीला महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी, उपाध्यक्ष करुणाकर शेट्टी, रमाकांत मालू, दिलीप गुप्ता, संजय सोनावणे, प्रफुल्ल मालानी, श्रीकृष्ण परब, महाराष्ट्र चेंबर बोर्ड ट्रस्ट चेअरमन आशिष पेडणेकर, कोल्हापूर चेंबरचे अध्यक्ष संजय शेटे आणि माजी अध्यक्ष प्रदीप कापडिया आदी मान्यवर उपस्थित होते.

अध्यक्ष ललित गांधी यांनी सर्व उपस्थितांचे स्वागत केले. यावेळी मागील सभेचा वृत्तांत वाचून कायम करण्यात आला. तसेच जमा – खर्चास मान्यता देण्यात आली. याचबरोबर संस्थेच्या घटनेत करावयाच्या बदलाची माहिती देण्यात आली. आगामी विशेष सर्वसाधारण सभेत घटना बदलाचा विषय घेण्यास मान्यता देण्यात आली.

यावेळी गेल्या तीन महिन्यात चेंबरने केलेल्या विविध उपक्रम आणि कार्यक्रमांची माहिती देण्यात आली. बैठकीच्या शेवटी कोल्हापूर चेंबरचे अध्यक्ष संजय शेटे आणि आंतरराष्ट्रीय मॅरेथॉन स्पर्धेत उल्लेखनीय यश मिळवलेल्या गोरख माळी यांचा आशिष पेडणेकर यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. बैठकीला चेंबरचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# देशाच्या प्रगतीसाठी स्वदेशी व्यापाराचा ध्यास

## डॉ. प्रतापसिंह जाधव यांची 'महाराष्ट्र चेंबर' शिष्टमंडळाशी चर्चा



◆ **कोल्हापूर : येथे 'महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीज'च्या शिष्टमंडळाशी चर्चा करताना दैनिक पुढारीचे मुख्य संपादक डॉ. प्रतापसिंह जाधव. सोबत महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी, सरचिटणीस सुधीर पाटील, उपाध्यक्ष नरेंद्र गवंडे, संचालक मंडळ सदस्य.**

**कोल्हापूर : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिलेल्या आत्म निर्भर भारतच्या मंत्राला चालना देत देशातील व्यापारवृद्धी आणि स्वदेशी उद्योगांना बळकटी मिळावी, यासाठी योग्य धोरणांची आखणी आवश्यक असल्याचे मत दैनिक पुढारीचे मुख्य संपादक डॉ. प्रतापसिंह जाधव यांनी व्यक्त केले. 'महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स ॲण्ड इंडस्ट्रीज'च्या शिष्टमंडळाने नुकतीच त्यांची भेट घेऊन विविध प्रश्नांवर चर्चा केली.**

बैठकीला 'महाराष्ट्र चेंबर'चे अध्यक्ष ललित गांधी, कोल्हापूरचे काँग्रेस प्रदेश सरचिटणीस संतोष पाटील, चेंबरचे सरचिटणीस सुधीर पाटील, उपाध्यक्ष नरेंद्र गवंडे, संचालक मंडळाचे सदस्य दिनकर कुलकर्णी, प्रा. संजय पाटील, संतोष यादव, संभाजी कोळी, यशवंत लोखंडे, दिलीप पाटील, प्रा. आनंद पाटील, प्रा. संभाजी जाधव, नितीन कोळी, दीपक पाटील, राजेंद्र हजारे, दत्ता माने, जयवंतराव पाटील, उदय शिरगावकर, चंद्रकांत पाटील, ज्येष्ठ पत्रकार शरद कुलकर्णी यांसह इतर पदाधिकारी उपस्थित होते.

यावेळी डॉ. जाधव यांनी सांगितले की, भारत हा १४० कोटी लोकसंख्येचा देश असून मोठ्या बाजारपेठेच्या रुपात जगासमोर उभा आहे. त्यामुळे भारतीय उत्पादकांना प्रोत्साहन देणे, स्वदेशी वस्तूंना प्राधान्य देणे आणि व्यापारासाठी न्याय्य टॅरिफ रचना आवश्यक आहे. अन्यथा आयातीमुळे देशातील उद्योग व व्यापार धोक्यात येऊ शकतो.

त्यांनी नमूद केले की, अमेरिकेसारख्या प्रगत राष्ट्रांनी देखील आपल्या देशाच्या सुरक्षेसाठी टॅरिफ धोरण आखले आहे. त्याच धर्तीवर भारतानेही उद्योगांचे रक्षण करणारे पाऊल उचलणे आवश्यक आहे. देशाची प्रगती रोखणारे अडथळे दूर करून व्यापार वृद्धीसाठी स्वदेशीचा मार्ग स्वीकारावा, असे आवाहन डॉ. जाधव यांनी केले.

चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी म्हणाले, कोल्हापूरच्या व्यापाऱ्यांसमोरील कोणताही प्रश्न आला, तर 'महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स ॲण्ड इंडस्ट्रीज' नेहमीच त्यांच्या पाठीशी उभा राहतो. डॉ. प्रतापसिंह जाधव यांच्यासारखे जनप्रतिनिधी पुढे येऊन व्यापाऱ्यांच्या मागण्या केंद्र सरकारपर्यंत पोहोचवत असतील, तर त्याचे सकारात्मक परिणाम होतील.

चेंबरचे संचालक मंडळ सदस्यांनी महागाई, वीजदरवाढ, कररचना, बदलती धोरणे या मुद्यांवर आपापली मते मांडली. या वेळी उपस्थित व्यापाऱ्यांनी डॉ. जाधव यांना लेखी मागण्या देऊन केंद्र सरकारकडून आवश्यक त्या सुधारणा व्हाव्यात, अशी अपेक्षा व्यक्त केली. डॉ. जाधव यांनी व्यापाऱ्यांना विश्वास दिला की, दिल्ली पातळीवर योग्य ठिकाणी हे मुद्दे मांडून उद्योग-व्यापार क्षेत्राच्या हितासाठी ते प्रयत्नशील राहतील.

# कोल्हापुरी चप्पल जागतिक ब्रँडिंगच्या दिशेने!

## केंद्र सरकारचा पथदर्शी प्रकल्प; महाराष्ट्र चेंबरची ठोस भूमिका

**नवी दिल्ली :** केंद्र सरकारने कोल्हापुरी चप्पलच्या जागतिक ब्रँडिंगसाठी राष्ट्रीय पातळीवर पथदर्शी प्रकल्प राबवण्याचा निर्णय घेतला आहे. या उपक्रमामुळे अनेक शतकांची परंपरा असलेले कोल्हापुरी चप्पल आता आंतरराष्ट्रीय स्तरावर ठसा उमटवेल, अशी ग्वाही केंद्रीय वाणिज्य मंत्रालयाच्या सचिव हिमानी पांडे यांनी दिली. प्राडा समवेत कायदेशीर लढाईऐवजी सहकार्याची भूमिका घेणे अधिक उपयुक्त ठरेल, असे मत 'महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स'चे अध्यक्ष ललित गांधी यांनी मांडले.

नवी दिल्ली येथे वाणिज्य व उद्योग मंत्रालयाच्या दालनात झालेल्या उच्चस्तरीय बैठकीत ललित गांधी यांनी कोल्हापुरी चप्पलच्या ब्रँडिंगसाठी सविस्तर भूमिका मांडली. सचिव हिमानी पांडे यांनी गांधी यांची भूमिका योग्य असल्याचे सांगितले.

या बैठकीला 'लिडकॉम'च्या कार्यकारी संचालक प्रेरणा देशभ्रतार, 'लिडकर'च्या संचालिका वसुंधरा, लेदर कौन्सिल ऑफ इंडियाच्या निधी केसवानी, 'डीटीआयआयटी' चे सहसचिव उपल पंडित, करण थापर, महाराष्ट्र चेंबरचे डॉ. धीरज कुमार, कोल्हापुरी चप्पल विक्रेत्यांचे प्रतिनिधी राजन सातपुते, जीआय रजिस्ट्रेशन विभाग, फॅशन इन्स्टिट्यूट ऑफ इंडियाचे वरिष्ठ अधिकारी आदी उपस्थित होते.

बैठकीत कोल्हापुरी चप्पलला मिळालेल्या जीआय टॅगचा पुरेपूर वापर करून आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत ब्रँडिंग वाढवण्याची गरज अधोरेखित करण्यात आली. ललित गांधी यांनी चप्पल उत्पादनातील गुणवत्ता, डिझाईनची अनोखी ओळख, टिकाऊपणा आणि हस्तकलेचा वारसा यांचा जागतिक स्तरावर प्रचार-प्रसार व्हावा, यासाठी सरकारने विशेष प्रयत्न करावेत, अशी मागणी केली. यावेळी 'प्राडा' या जागतिक फॅशन ब्रँडने त्यांच्या कलेक्शनमध्ये कोल्हापुरी डिझाईनचा वापर केल्याचे उदाहरण



◆ **नवी दिल्ली : केंद्रीय वाणिज्य मंत्रालयाच्या उच्चस्तरीय बैठकीत कोल्हापुरी चप्पलच्या ब्रँडिंग बाबत भूमिका मांडताना महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी. बाजूला प्रेरणा देशभ्रतार, डॉ. धीरज कुमार, राजन सातपुते आदी.**

देण्यात आले. या घटनेतून कोल्हापुरी चप्पलची आंतरराष्ट्रीय लोकप्रियता स्पष्ट झाली आहे. मात्र, या परंपरेचा मूळ फायदा कारागिरांना मिळावा, यासाठी केंद्र सरकारने ठोस पावले उचलण्याची गरज असल्याचे गांधी यांनी सांगितले.

पथदर्शी प्रकल्पांतर्गत कोल्हापुरी चप्पलचे आंतरराष्ट्रीय प्रदर्शन, जागतिक दर्जाचे मार्केटिंग मॉडेल, आधुनिक डिझाईन सुधारणा, तसेच कारागिरांना तांत्रिक प्रशिक्षण देण्याची कार्ययोजना तयार होणार आहे. या उपक्रमामुळे स्थानिक कारागिरांचे उत्पन्न वाढेल, नवे रोजगार उपलब्ध होतील आणि पारंपरिक कौशल्य टिकून राहील, असा विश्वास गांधी यांनी यावेळी व्यक्त केला.

कोल्हापुरी चप्पल ही केवळ पादत्राणे नसून महाराष्ट्राच्या सांस्कृतिक वारशाचे प्रतीक आहे. त्यामुळे या उपक्रमामुळे राज्यातील कारागिरांना नवसंजीवनी मिळेल आणि 'मेड इन इंडिया' संकल्पनेला मोठा हातभार लागेल, असे बैठकीत स्पष्ट करण्यात आले.

## महाराष्ट्र चेंबर दिवाळी विशेषांक - आपल्या व्यवसायासाठी सुवर्णसंधी

महाराष्ट्र राज्यातील उद्योग, व्यापार आणि कृषी क्षेत्रातील हितसंबंधांचे जतन व प्रगतीसाठी कार्यरत महाराष्ट्र राज्य चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्रीज अँड ॲग्रिकल्चर दर महिन्याला महाराष्ट्र चेंबर पत्रिका हे मासिक प्रकाशित करते. या मासिकाला उद्योगजगत, व्यापारी वर्ग, शेतकरी, शासकीय अधिकारी तसेच धोरणकर्ते यांचा मोठा प्रतिसाद मिळतो.

दरवर्षीप्रमाणे यंदाही आम्ही दिवाळी विशेषांक प्रकाशित करीत आहोत. या अंकात आपल्या व्यवसाय, उत्पादन व सेवांची जाहिरात देऊन आपण राज्यभरातील हजारो उद्योजक व वाचकांपर्यंत पोहोचू शकता. दिवाळी अंक हा केवळ स्मरणीय ठेवा नसून आपल्या ब्रँडसाठी प्रभावी प्रचाराचे साधन ठरेल.




उद्योग, व्यापार व कृषी क्षेत्रातील मान्यवर उद्योजकांनी आपल्या जाहिराती पाठवून या विशेषांकाला समृद्ध करावे.

# भारताचे सिंगापूरसोबत पाच मोठे करार

## प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि सिंगापूरचे पंतप्रधान लॉरेन्स वोंग यांच्यात नवा रोडमॅप

**रोडमॅपद्वारे आठ क्षेत्रांत सहकार्य दृढ करण्याचा निर्णय दोन्ही देशांत तंत्रज्ञान व संरक्षण क्षेत्रात महत्त्वपूर्ण उपक्रम**



**नवी दिल्ली :** भारत आणि सिंगापूर या दोन आशियाई देशांमध्ये व्यापक धोरणात्मक भागीदारी अधिक बळकट करण्यासाठी नवा रोडमॅप जाहीर करण्यात आला. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि सिंगापूरचे पंतप्रधान लॉरेन्स वोंग यांच्या द्विपक्षीय चर्चेत हा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला. दोन्ही देशांमधील संबंधांच्या ६० वर्षांच्या पार्श्वभूमीवर झालेल्या या घोषणेला ऐतिहासिक महत्त्व आहे.

या रोडमॅपद्वारे आठ क्षेत्रांत सहकार्य दृढ करण्याचे ठरविण्यात आले आहे. त्यात आर्थिक सहयोग, डिजिटलायझेशन, शाश्वतता, कनेक्टिव्हिटी, आरोग्य व औषधे, कौशल्य विकास, संरक्षण व सुरक्षा आणि लोकांमधील थेट संबंधांचा समावेश आहे.

दोन्ही देशांनी तंत्रज्ञान व संरक्षण क्षेत्रात महत्त्वपूर्ण उपक्रम हाती घेतले आहेत. विशेषतः सेमीकंडक्टर उत्पादन, आर्टिफिशियल इंटेलिजन्स, क्वांटम संगणन आणि अनमॅन्ड यंत्रणा या विषयांत संयुक्त संशोधन व प्रशिक्षण सुरू होणार आहे. समुद्री सुरक्षेसाठी मालाका सामुद्रधुनीतील संयुक्त गस्त आणि 'ग्रीन अँड डिजिटल शिपिंग कॉरिडॉर'सारख्या योजना ठरल्या आहेत.

वित्तीय क्षेत्रात रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया आणि सिंगापूर मॉनेटरी अथॉरिटी यांच्यात डिजिटल मालमत्ता व क्रॉस बॉर्डर पेमेंट्सवर सहकार्य वाढविण्याचा करार झाला आहे. तसेच चेन्नई येथे ॲडव्हान्स्ड मॅन्युफॅक्चरिंगसाठी National Centre of Excellence उभारण्याचे ठरले आहे.

**करारातील ठळक बाबी**

- **तंत्रज्ञान :** सेमीकंडक्टर, एआय, क्वांटम कंप्यूटिंग, ऑटोमेशन
- **संरक्षण :** मालाका सामुद्रधुनीत संयुक्त गस्त, संरक्षण तंत्रज्ञान सहकार्य
- **डिजिटल पेमेंट्स :** UPI-PayNow जोडणीचा विस्तार, डिजिटल मालमत्ता सहकार्य
- **कौशल्य विकास :** चेन्नईत उत्कृष्टता केंद्र, संयुक्त प्रशिक्षण कार्यक्रम
- **शाश्वतता :** 'ग्रीन अँड डिजिटल शिपिंग कॉरिडॉर'

# महाराष्ट्र चेंबरतर्फे वैश्विक युवा कौशल्य दिन साजरा

**नाशिक :** केंद्र सरकार आणि राज्य शासनाने आपल्या धोरणामध्ये कौशल्य विकासाला प्राध्यान्य दिले आहे. या दृष्टीने त्यासाठी स्वतंत्र मंत्रालय आणि प्रत्येक जिल्ह्यातून कौशल्य विकासासाठी खास विभाग सुरू केले असून त्या माध्यमातून कौशल्य विकास चळवळ वृद्धिंगत करण्याचे प्रयत्न केले जात आहेत. या चळवळीमध्ये सहभागी व्हा, असे आवाहन कौशल्य विकास व रोजगार विभागाचे सहाय्यक आयुक्त विजय रिसे यांनी केले. जागतिक युवा कौशल्य दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमामध्ये प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्र चेंबरचे उपाध्यक्ष संजय सोनवणे होते.

याप्रसंगी राष्ट्रीय व्यावसायिक आणि प्रशिक्षण परिषद विभागाचे संचालक डॉ. सुहास देशमुख, कौशल्य विकास व रोजगार विभागाचे सहाय्यक आयुक्त विजय रिसे, एज्युकेशन अँड स्किल डेव्हलपमेंट समितीचे को चेअरमन व्ही. नामदेव, कृषी व ग्रामविकास समितीचे चेअरमन राजाराम सांगळे, एमबीएन फोरमचे चेअरमन बाळासाहेब आम्रे, सोच फॉउंडेशनच्या पल्लवी गांगुर्डे व्यासपीठावर उपस्थित होते.

याप्रसंगी विविध क्षेत्रामध्ये विशेष असे कौशल्य सिद्ध केलेल्या कामगार, स्वयंम व्यावसायिक आणि सेवा व्यवसायातील कर्मचारी अशा ६० व्यक्तींचा खास गौरवपत्र देऊन सन्मान करण्यात आला. राजाराम सांगळे यांनी स्वागत केले. डॉ. सुहास देशमुख यांनी कौशल्य विकासाच्या संदर्भातील प्रशिक्षण कार्याची माहिती दिली. व्ही. नामदेव यांनी कौशल्य विकास धोरणातील महत्वाच्या बाबी सर्वांना अवगत केल्या. सचिन शहा यांनी आभार मानले.

# उत्तर प्रदेशात इंटरनॅशनल ट्रेड शो २०२५

## मुंबईत भव्य रोड शो : २५ ते २९ सप्टेंबर दरम्यान ग्रेटर नोएडा येथे मेळावा







◆ **मुंबई : येथे आयोजित कार्यक्रमात बोलताना महाराष्ट्र चेंबर्सचे अध्यक्ष ललित गांधी. व्यासपीठावर मंत्री राकेश सचान, हस्तकला निर्यात संवर्धन परिषदेचे (EPCH) अध्यक्ष नीरज खन्ना आणि इतर मान्यवर. दुसऱ्या छायाचित्रात मंत्री राकेश सचान यांचे स्वागत करताना महाराष्ट्र चेंबर्सचे अध्यक्ष ललित गांधी.**

**मुंबई :** उत्तर प्रदेश सरकारतर्फे आगामी उत्तर प्रदेश इंटरनॅशनल ट्रेड शो २०२५च्या प्रचारार्थ २५ जुलै रोजी मुंबईत रोड शोचे आयोजन करण्यात आले होते. या पार्श्वभूमीवर इंडियन मर्चंट्स चेंबर (IMC) येथे उत्तर प्रदेशचे सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग, खादी, ग्रामोद्योग, रेशीम व वस्त्रोद्योग मंत्री राकेश सचान यांच्या नेतृत्वाखाली एका कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. त्यांच्यासोबत हस्तकला निर्यात संवर्धन परिषदेचे (EPCH) अध्यक्ष नीरज खन्ना उपस्थित होते.




या रोड शोद्वारे उत्तर प्रदेशातील औद्योगिक प्रगती, निर्यात क्षमता आणि गुंतवणूकदारांसाठी अनुकूल वातावरण यांचा आढावा घेण्यात आला. या कार्यक्रमाला महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी आणि सरचिटणीस नीलाक्षी राधाकृष्णन आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी महाराष्ट्र आणि उत्तर प्रदेश राज्यांमधील औद्योगिक सहकार्य आणि उद्योग-आधारित भागीदारी मजबूत करण्याचा संदेश देण्यात आला.

कार्यक्रमादरम्यान सर्व उपस्थित उद्योगपती, उद्योजक आणि गुंतवणूकदारांना उत्तर प्रदेश इंटरनॅशनल ट्रेड शो २०२५मध्ये सहभागी होण्याचे आमंत्रण देण्यात आले. हा मेळावा २५ ते २९ सप्टेंबर २०२५ दरम्यान इंडिया एक्स्पो मार्ट, ग्रेटर नोएडा येथे होणार आहे.

या ट्रेड शोमध्ये देश-विदेशातील उत्पादक, निर्यातदार, खरेदीदार आणि गुंतवणूकदारांना एकाच व्यासपीठावर आणून व्यवसाय वृद्धी आणि निर्यात विस्तारासाठी नवे मार्ग खुले करण्याचे उद्दिष्ट आहे. उत्तर प्रदेश सरकारच्या या उपक्रमामुळे राज्याच्या उद्योग धंद्यांना जागतिक पातळीवर नवी ओळख मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली.

**“ उद्योगाचा उद्देश्य केवळ नफा कमावणे नाही, तर समाजाचा विकास करणेही आहे**

**जमशेदजी टाटा,**
भारतीय उद्योगाचे जनक



# इगतपुरी-नाशिकमध्ये महिंद्राचा मेगा प्रकल्प

## उद्योगमंत्री सामंत यांची घोषणा : नाशिक गुंतवणुकीचा नवा युगारंभ




◆ **नाशिक : पत्रकार परिषदेत बोलताना उद्योगमंत्री उदय सामंत. सोबत शिक्षणमंत्री दादा भुसे, अन्न व औषध मंत्री नरहरी झिरवळ, आमदार सीमा हिरे, आमदार सरोज आहेर, आमदार दिलीपकाका बंकर, आमदार हिरामण खोसकर आणि चेंबरचे पदाधिकारी.**

**नाशिक :** येथील औद्योगिक विकास आता नव्या उंचीवर जाणार आहे. इगतपुरीत महिंद्राचा भव्य प्रकल्प उभारण्याची औपचारिक घोषणा उद्योगमंत्री उदय सामंत यांनी केली. मंत्री उदय सामंत, शिक्षणमंत्री दादा भुसे, अन्न व औषध मंत्री नरहरी झिरवळ, आमदार सीमा हिरे, आमदार सरोज आहेर, आमदार दिलीपकाका बंकर, आमदार हिरामण खोसकर, वरिष्ठ शासकीय अधिकारी आणि नामांकित संघटनांचे प्रतिनिधी यांनी नाशिक इंडस्ट्रीज मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन (NIMA) हाऊसला भेट दिली. यावेळी ते बोलत होते.

नाशिक जिल्हा देशातील क्रमांक एकचे औद्योगिक गुंतवणूक केंद्र बनण्याच्या दिशेने मोठे पाऊल टाकत आहे. या प्रकल्पामुळे उद्योग, रोजगार आणि स्थानिक अर्थव्यवस्थेला मोठी चालना मिळेल, असेही ते म्हणाले. या भेटीत नाशिक औद्योगिक क्षेत्रातील संधी, आव्हाने, पायाभूत सुविधा, कौशल्यविकास, शिक्षण आणि रोजगारनिर्मिती यांसारख्या विषयांवर सखोल चर्चा झाली. यावेळी मंत्री सामंत यांनी एनआयएमए अध्यक्षांना महिंद्राचा नवा प्रकल्प इगतपुरी येथे उभारण्यात येणार असल्याचे पुष्टीपत्र प्रदान केले.

या प्रकल्पामुळे थेट व अप्रत्यक्ष हजारो रोजगार उपलब्ध होतील. तसेच पूरक उद्योगांना चालना मिळून स्थानिक उद्योजकांना राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत स्पर्धा करण्याची नवी संधी मिळेल, असेही मंत्री सामंत म्हणाले.

या बैठकीनंतर उपस्थित मान्यवरांनी शासन, एनआयएमए आणि उद्योग क्षेत्र एकत्र येऊन नाशिकला गुंतवणुकीसाठी सर्वोत्तम ठिकाण बनवण्याचा निर्धार व्यक्त केला. या ऐतिहासिक पावलामुळे नाशिकच्या औद्योगिक प्रगतीला अभूतपूर्व वेग मिळेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

दरम्यान, यावेळी नाशिक इंडस्ट्रीज मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशनचे पदाधिकारी आणि अधिकारी उपस्थित होते.

# भारत-हाँगकाँग व्यापार सहकार्याला नवी दिशा

## वाणिज्यदूत राजेश नाईक यांची महाराष्ट्र चेंबरच्या कार्यालयास भेट




**मुंबई :** महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सतर्फे भारताचे हाँगकाँगसाठी नियुक्त वाणिज्य दूत राजेश नाईक यांचे स्वागत करण्यात आले. राजेश नाईक यांनी नुकतीच महाराष्ट्र चेंबरच्या मुख्य कार्यालयास भेट दिली. यावेळी महाराष्ट्र चेंबरचे उपाध्यक्ष करुणाकर शेट्टी, दत्ता भालेराव व इतर मान्यवर सदस्य उपस्थित होते.

यावेळी झालेल्या बैठकीत द्विपक्षीय व्यापार दृढ करण्यासोबतच परस्पर सहकार्य वाढवण्याच्या विविध संधींवर चर्चा झाली. विशेषतः लॉजिस्टिक्स, रत्न-आभूषणे आणि पर्यटन क्षेत्रातील संधींचा शोध घेण्यावर भर देण्यात आला. महाराष्ट्र चेंबर तर्फे आयातदार-निर्यातदारांशी उत्पादनांची माहिती शेअर करण्यासाठी, व्हिसा प्रक्रियेत सुलभता आणण्यासाठी तसेच आगामी व्यापार मेळ्यांची अद्यतने देण्यासाठी सहकार्याची विनंती करण्यात आली.

नाईक यांनी महाराष्ट्र चेंबरच्या उद्योग आणि व्यापार क्षेत्रातील योगदानाचे मनापासून कौतुक केले. त्यांनी नवीन उपक्रमांत महाराष्ट्र चेंबर सोबत कार्य करण्याची इच्छा व्यक्त केली. याशिवाय, चेंबर तर्फे व्यवसाय प्रतिनिधीमंडळाचे हाँगकाँगमध्ये नेतृत्व करावे, असे निमंत्रणही त्यांनी दिले.

# नाशिक औद्योगिक वसाहतीत सीईटीपी प्लांट उभारणार

## मंत्री पंकजा मुंडे : महाराष्ट्र चेंबरच्या शिष्टमंडळाचे मागण्यांचे निवेदन

**नाशिक :** नाशिकमध्ये २०२७ मध्ये होणाऱ्या कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर गोदावरी नदीचे प्रदूषण रोखण्यासाठी कायमस्वरूपी उपाययोजना करण्यात यावी. एअर क्वालिटी इंडेक्स मोजणारी साधने शहराच्या इतर ठिकाणीही बसविण्यात यावीत, अशी मागणी पर्यावरण, हवामान बदल आणि पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांच्याकडे महाराष्ट्र चेंबरचे उपाध्यक्ष संजय सोनवणे यांनी निवेदनाद्वारे केली.

मंत्री पंकजा मुंडे यांनी महाराष्ट्र चेंबरने केलेल्या मागणीचा प्राधान्याने विचार करून प्रदूषण रोखण्यासाठी तातडीने उपाययोजना करण्याचे आश्वासन महाराष्ट्र चेंबरच्या शिष्टमंडळाला दिले. तसेच नव्याने होणाऱ्या औद्योगिक वसाहती करताना पायाभूत सुविधांमध्ये सीईटीपी प्लांट अंतर्भूत करण्याबाबत कार्यवाही करण्यात येईल, असे सांगितले.

महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी यांच्या मार्गदर्शनाखाली उपाध्यक्ष संजय सोनवणे यांच्या नेतृत्वाखाली शिष्टमंडळाने शनिवार दि. २ ऑगस्ट २०२५ रोजी पर्यावरण, हवामान बदल आणि पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांची निमा हाऊस येथे भेट घेतली. याप्रसंगी को-चेअरमन भावेश मानेक, संजय राठी, कार्यकारिणी सदस्य डॉ. सोनल कासलीवाल दगडे, रतन पडवळ, श्रीकांत पाटील, श्रीधर व्यवहारे, सचिन जाधव, सहाय्यक सचिव अविनाश पाठक आदीसह कार्यकारिणी सदस्य उपस्थित होते.



**◆ मुंबई : मंत्री पंकजा मुंडे यांना निवेदन देताना महाराष्ट्र चेंबरचे उपाध्यक्ष संजय सोनवणे. बाजूला इतर मान्यवर.**

# जोखीम हाताळा आणि यशस्वी व्हा: यशवंत सिंग

## मासिआ बिझनेस नेटवर्किंग फोरमच्या माध्यमातून सदस्यांचा साडेतीन कोटींचा व्यवसाय

**नाशिक :** कोणत्याही कामाला कमी समजू नये, कामानेच माणूस मोठा होतो. जो भिडता है, वही जीतता है. टेक्नॉलॉजी को गले लगाओ, धंदा दमदार बनाओ. जो घाबरतो तो मागे राहतो. त्यामुळे जोखीम टाळू नका. जोखीम हाताळा आणि यशस्वी व्हा, असे सांगत सूक्ष्म लघु व मध्यम उद्योगांना मोठे करण्याचे दहा मंत्र सॅमसोनाईट या बहुराष्ट्रीय कंपनीचे व्हाईस चेअरमन यशवंत सिंग यांनी दिले. मासिआ बिझनेस नेटवर्किंग फोरमच्या मिटिंगमध्ये मार्गदर्शन करताना ते बोलत होते.

गेल्या पंधरवड्यात मासिआ बिझनेस नेटवर्किंग फोरमच्या माध्यमातून सदस्यांचा आपापसात ३ कोटी ६४ लाखांचा व्यवसाय झाल्याची माहिती मासिया बिजनेस कोअर टीमचे सदस्य डॉ. संदीप बोरसे यांनी दिली. यावेळी नेटवर्किंग फोरमचे नाशिक चॅप्टर हेड बाळासाहेब आंब्रे यांनी स्वागत करून फोरमची माहिती दिली व उद्देश सांगितला. कृषी आणि ग्रामविकास समितीचे चेअरमन राजाराम सांगळे यांनी महाराष्ट्र चेंबरची माहिती दिली. सुरुवातीला शेठ वालचंद हिराचंद यांच्या प्रतिमेस प्रमुख पाहुणे यशवंत सिंग यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

कार्यक्रमात प्रेझेंटेशन करताना पर्यटन क्षेत्रातील ज्येष्ठ पर्यटन व्यावसायिक दत्ता भालेराव यांनी त्यांच्या व्यवसायाची संपूर्ण माहिती चित्रफितीद्वारे दिली. भालेराव यांनी गोंजाहू चीनमध्ये होणाऱ्या कॅन्टोन फेअर प्रदर्शनाबद्दल माहिती दिली. या प्रदर्शनाचा व्यापार-उद्योगांच्या विकासासाठी कसा फायदा होऊ शकतो, याची चित्रफितीद्वारे माहिती दिली.

सुरवातीला उपाध्यक्ष संजय सोनवणे यांनी चेंबरच्या कामाची माहिती दिली तसेच प्रमुख पाहुण्यांचा परिचय करून दिला. बिजनेस फोरमच्या नाशिक चॅप्टरचे कोअर टीम सदस्य राहुल जैन यांनी आभार मानले.

यावेळी रवींद्र झोपे, राजेंद्र कोठावदे, संदीप हिरे, सचिन जाधव, आनंद सूर्यवंशी, प्रशांत दाणेज, मिलिंद खैरनार, अशोक घुले, सुशील वाडकर, कैवल्य रिस्बुड, विनायक चव्हाण आशुतोष गायकवाड अमित सातपुते विकास पाटील, डॉ. सुनील भोये, शैलेश बागुल, तुषार श्रीवास्तव, डॉ.संदीप बोरसे, विजय गायकवाड, पुष्कराज गवळी, नितीन धात्रक, सिद्धार्थ काळे, किशोर पंडित, सतीश शिंदे, अशोक रहाणे, राहुल जैन, विवेक भालेराव, सहाय्यक सचिव सचिन जाधव उपस्थित होते.

# महाराष्ट्र चेंबर समवेत संयुक्तरित्या काम करू: सिद्धिका बॅनर्जी

## ब्रिटिश डेप्युटी हाय कमिशनच्या पश्चिम भारत गुंतवणूक संचालकांची माहिती



